मंगळवार, १९ ऑक्टोबर २०२१
◆ वर्ष १४ ◆ अंक ९२
www.ramprahar.com
राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## दिवाळीसाठी विशेष रेल्वेगाड्यांची व्यवस्था



**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने दिवाळीसाठी विशेष रेल्वेगाड्यांची व्यवस्था केली आहे. दरवर्षी दिवाळीमध्ये गावी जाणाऱ्या प्रवाशांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होते. त्यामुळे गर्दी होण्यापूर्वीच मध्य रेल्वे विभागाने फेस्टिवल स्पेशल ट्रेन सुरू करण्याची तयारी केली आहे. नागपूर-करमाळी (गोवा) साप्ताहिक सुपरफास्ट विशेष ट्रेन, मुंबई-नागपूर साप्ताहिक सुपरफास्ट विशेष ट्रेन, पुणे ते भगत की कोठी (जोधपूर, राजस्थान) साप्ताहिक विशेष ट्रेन अशा या गाड्या असून रेल्वे विभागाने त्यांचे आरक्षण सुरू केले आहे, मात्र प्रवाशांना विशेष ट्रेनसाठी अतिरिक्त शुल्क भरावे लागणार आहे. सणासुदीच्या काळात प्रवाशांची वाढती गर्दी आणि तिकिटांची मागणी पाहता रेल्वेने हे पाऊल उचलले आहे. या गाड्या मुंबई, पुणे आणि नागपूर-करमाळीदरम्यान धावतील.


### अंतरंग
'राज्य सरकारचे एकतरी काम पारदर्शक पाहिजे'/२
महावितरणच्या रोहित्रांवर कर आकारणी करा/५
टी-२० वर्ल्डकपमध्ये स्कॉटलंडची बांगलादेशवर मात/६


# कोरोना निर्बंधात शिथिलता

## राज्यातील उपाहारगृहे, दुकानांची वेळ वाढवण्याचा निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**

कोरोना रुग्णसंख्येत घट होत असल्याने राज्यातील उपाहारगृहे, दुकानांच्या वेळा वाढविण्यासंदर्भात सोमवारी (दि. १८) टास्क फोर्सच्या बैठकीत विचारविनिमय करण्यात आला, तसेच अम्युझमेंट पार्कमधील मोकळ्या जागेत कोरड्या राईड्ससाठी परवानगी देण्याचे ठरले. पार्क्समधील पाण्यातल्या राईड्सबाबत मात्र नंतर निर्णय घेण्याचे ठरले.



वर्षा निवासस्थानी झालेल्या या बैठकीस मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, मुख्य सचिव सीताराम कुंटे, आरोग्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. प्रदीप व्यास, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव आशिष कुमार सिंह, प्रधान सचिव विकास खारगे, मदत व पुनर्वसन विभागाचे प्रधान सचिव असिमकुमार गुप्ता, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव सौरव विजय, संचालक डॉ. दिलीप म्हैसेकर, मुख्यमंत्र्यांचे विशेष सल्लागार डॉ. दीपक म्हैसेकर, पालिका उपायुक्त सुरेश काकाणी, टास्क फोर्सचे डॉ. संजय ओक, शशांक जोशी, डॉ. राहुल पंडित, डॉ. खुसराव्ह, डॉ. अजित देसाई, डॉ. सुहास प्रभू आदी उपस्थित होते.

राज्यातील नाट्यगृहे आणि चित्रपटगृह २२ ऑक्टोबरपासून सुरू केली जाणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर उपाहारगृहांची वेळदेखील वाढवण्याची मागणी करण्यात आली होती. भाजपनेही हा मुद्दा उचलून धरला होता. त्यानुसार ही वेळ वाढवली जाणार असून या संदर्भातील मार्गदर्शक सूचना तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या बैठकीत अम्युझमेंट पार्कबाबतही चर्चा झाली. अम्युझमेंट पार्कदेखील २२ ऑक्टोबरपासून सुरू होत आहेत. अम्युझमेंट पार्कमधील मोकळ्या जागेत इतर राईड्ससाठी परवानगी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, मात्र पाण्यातल्या राईड्सबाबत नंतर निर्णय घेण्याचे ठरले.

दरम्यान, मुलांच्या लसीकरणासंदर्भात केंद्राच्या संपर्कात राहून लस उपलब्ध करून घेणे, तसेच याबाबतीत निर्णय झाल्यावर लसीकरणाची तयारी ठेवण्याचे नियोजन करण्याच्या सूचना सार्वजनिक आरोग्य विभागास करण्यात आल्या.

कोरोनाची दुसरी लाट ओसरली असली, तरी तिसऱ्या लाटेचा धोका अद्याप कायम आहे. नियमित मास्क घालणे, सुरक्षित अंतर पाळणे व हात स्वच्छ धूत राहणे खूप आवश्यक आहे, तसेच याबाबतीत लोकांनी बेसावध राहू नये. यासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात यावी, असेही सूचित करण्यात आले.

# मुख्यमंत्री, उद्योगमंत्री शिवसेनेचे, तरीही यांना मोर्चा काढावा लागतोय

## शेकापच्या पंडित पाटलांनी डिवचले, राष्ट्रवादीवरही टीका

**रेवदंडा : प्रतिनिधी**

राज्याचे मुख्यमंत्री आणि उद्योगमंत्री शिवसेनेचे असताना यांना जेएसडब्ल्यू कंपनीवर मोर्चा काढावा लागतोय याचे आश्चर्य वाटते, अशा शब्दांत माजी आमदार सुभाष ऊर्फ पंडित पाटील यांनी शिवसेनेला डिवचले आहे. बोर्ली येथील शेकापच्या मुरूड तालुका मध्यवर्ती कार्यालयाच्या शुभारंभ कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी त्यांनी असंगाशी संग केल्याने व नियोजनअभावी मागील विधानसभा निवडणुकीत पराभवास सामोरे जावे लागल्याचा पुनरूच्चार करीत राष्ट्रवादीवरदेखील टीका केली.



पेण तालुक्यातील डोलवीजवळील जेएसडब्ल्यू कंपनीविरोधात शिवसेनेने १८ ऑक्टोबर रोजी जनआंदोलन पुकारले होते. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कंपनी प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी राज्याचे उद्योगमंत्री सुभाष देसाई यांच्याशी संपर्क साधला. त्यानुसार मंत्रीमहोदयांच्या दालनात उभयतांमध्ये बैठक झाली. या बैठकीला आमदार महेंद्र दळवी, आमदार महेंद्र थोरवे यांच्यासह कंपनीचे अधिकारी उपस्थित होते. या वेळी झालेल्या चर्चेत कंपनी प्रशासनाने स्थानिक युवकांना रोजगार देण्याचे मान्य केल्याने आंदोलन स्थगित करण्यात आल्याचे आमदार दळवी यांनी पेण येथील पत्रकार परिषदेत सांगितले. हाच धागा पकडून शेकापचे माजी आमदार पंडित पाटील यांनी शिवसेनेला लक्ष्य केले आहे.

राज्यातील महाविकास आघाडी सरकारमध्ये असलेल्या शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस या तीन पक्षांमधील असमन्वय अनेकदा समोर आला आहे. रायगड जिल्ह्यातही महाविकास आघाडीत आलबेल नसून अलीकडे शेकापही महाआघाडीतील सहकारी पक्षांना लक्ष्य करू लागला आहे. बोर्ली येथील भाषणात पंडित पाटील यांनी शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसवर टीकास्त्र सोडले. विभागातील अनेक रस्ते राज्य सरकारकडे निधी उपलब्ध नसल्याने रखडल्याचे ते म्हणाले.

# खारघरमध्ये कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरण शिबिर उत्साहात

## आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघर से. ११ मधील शिवशंभो सोसायटीत प्रतीक्षा मंगेश कदम यांच्या मागणीनुसार पनवेल महापालिकेमार्फत रविवारी (दि. १७) कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरण शिबिर घेण्यात आले. या शिबिराला भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

लसीकरण शिबिराचा १५०पेक्षा जास्त नागरिकांनी लाभ घेतला. या वेळी नगरसेवक शत्रुघ्न काकडे, प्रवीण पाटील, भाजप अध्यक्ष ब्रिजेश पटेल, कीर्ती नवघरे, मंगेश कदम, गीता चौधरी, मोना अडवाणी, साधना पवार, अश्विनी भुवड, सुप्रिया दळवी उपस्थित होते.

शिबिराचे नियोजन अभिषेक इंगळे यांनी केले, तर अजय इंगळे, निलेश नाईकवाडी, अंकुर शर्मा, अजय गर्जे, रोहित शिंदे, प्रफुल्ल चंदनशिवे, तसेच सोसायटी पदाधिकारी, रहिवाशांचे सहकार्य लाभले.



## खासदार गवळींना ईडीचे पुन्हा समन्स

**यवतमाळ : प्रतिनिधी**

बेहिशोबी मालमत्ता आणि घोटाळाप्रकरणी शिवसेना खासदार भावना गवळी यांची सध्या सक्तवसुली संचालनालय अर्थात ईडीकडून चौकशी सुरू आहे. गेल्या महिन्यात ईडीने गवळी यांना समन्स बजावले होते, तसेच त्यांचे निकटवर्तीय सईद खान यांना अटक केलेली आहे. आता पुन्हा ईडीने गवळींना समन्स बजावत बुधवारी (दि. २०) चौकशीसाठी हजर राहण्यास सांगितले आहे.

## निवडक

### गुरमीत राम रहीमला हत्येप्रकरणी जन्मठेप

**चंदीगड :** रणजीत सिंह हत्या प्रकरणात पंचकुलामधील विशेष सीबीआय कोर्टाने सर्व आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. आरोपींमध्ये डेरा सच्चा सौदाचे गुरमीत राम रहीम यांचाही समावेश आहे. रणजीत सिंह हे राम रहीम यांचे माजी मॅनेजर होते. २००२मध्ये त्यांची हत्या झाली होती. **(सविस्तर वृत्त पान २ वर..)**

### ईडी चौकशीसाठी जॅकलिन फर्नांडिस चौथ्यांदा गैरहजर

**मुंबई :** दोनशे कोटी रुपयांच्या अफरातफर (मनी लॉण्डरिंग)चा आरोप असलेली बॉलीवूड अभिनेत्री जॅकलीन फर्नांडिस चौथ्यांदा गैरहजर राहिली. जॅकलिनला या प्रकरणाच्या चौकशीसाठी सोमवारी (दि. १८) ईडी कार्यालयात हजर व्हायचे होते. यापूर्वी १६ ऑक्टोबरलादेखील जॅकलिन चौकशीसाठी गेली नव्हती. दरम्यान, तिने नोव्हेंबर महिन्यापर्यंत चौकशी पुढे ढकलावी, अशी विनंती ईडीच्या अधिकाऱ्यांना केल्याचे वृत्त आहे.

# एक्स्प्रेस वेवर सहा वाहनांचा अपघात

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर अपघातांची मालिका सुरूच असून खंडाळा घाटात सोमवारी (दि. १८) पहाटे सहा वाहनांचा विचित्र व भीषण अपघात झाला. यामध्ये तीन जणांचा जागीच मृत्यू झाला आहे.

महामार्ग वाहतूक पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईच्या दिशेने भरधाव वेगात जाणाऱ्या एका टेम्पोचालकाचे तीव्र उतारावर वाहनवरील नियंत्रण सुटल्याने तो समोरील भाजीच्या टेम्पोवर मागून आदळला. या धक्क्याने भाजीचा टेम्पो पुढच्या कारवर आदळला. टेम्पोच्या धडकेने ही कार कोंबड्यांची वाहतूक करणाऱ्या टेम्पोवर मागून आदळली, तर तो कोंबड्याचा टेम्पो पुढे एका प्रवासी बसवर जोरात आदळला. त्याच वेळी दुसरी एक हुंदाई कार कोंबड्यांची वाहतूक करणाऱ्या टेम्पोवर आदळल्यावर ती कार मागून येणाऱ्या ट्रेलर आणि कोंबड्यांची वाहतूक करणाऱ्या टेम्पोच्या मध्ये चिरडली. या अपघातात हुंदाई कारचा चालक, अन्य एक जण आणि कोंबड्यांची वाहतूक करणाऱ्या टेम्पोचा चालक असा तिघांचा जागीच मृत्यू झाला.

**तीन जण जागीच ठार**



मृतांमध्ये कारमधील इर्शाद सिद्दीकी (वय ३२, रा. वांद्रे प. मुंबई), रोनक मोरदानी (वय २, रा. खार, मुंबई) आणि टेम्पोचालक (नाव, गाव समजले नाही) यांचा समावेश आहे, तर सहा जण जखमी झाले आहेत.

बोरघाट व खोपोली वाहतूक पोलीस, आयआरबी, डेल्टा, मृत्युंजय देवदूत यंत्रणा, अपघातग्रस्तांच्या मदतीला संस्थेचे कार्यकर्ते, लोकमान्यची टीम एवढ्या यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेत मयत व जखमी यांना बाहेर काढले, तसेच वाहतूक सुरळीत केली.

## व्हायरल झालेले दहावी-बारावी परीक्षांचे वेळापत्रक फेक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सोशल मीडियात सध्या व्हायरल झालेल्या केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) दहावी-बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक फेक असून ते बोर्डाने जाहीर केलेले नाही, असे स्पष्टीकरण स्वतः सीबीएसई बोर्डाकडून देण्यात आले आहे.

दहावी, बारावीच्या पहिल्या टर्मच्या परीक्षेचे वेळापत्रक सीबीएईकडे तयार आहे, मात्र बोर्डाकडून अधिकृत न केलेले वेळापत्रक सोशल मीडियामध्ये सध्या व्हायरल झाले आहे. यावर बोर्डाकडून ट्विटरद्वारे स्पष्टीकरण देण्यात आले आहे. विद्यार्थ्यांमध्ये गोंधळ निर्माण करण्यासाठी पहिल्या टर्मचे वेळापत्रक सध्या सोशल मीडियामध्ये व्हायरल झाले आहे, मात्र या परीक्षांसंदर्भात आतापर्यंत बोर्डाने अधिकृत वेळापत्रक जाहीर केलेले नाही.

# आजची शिवसेना उपऱ्यांचे वर्चस्व असणारी

## विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकरांचा राऊतांवर प्रतिहल्ला

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेना खासदार संजय राऊत यांनी भाजप हा उपऱ्यांचा पक्ष झाल्याची टीका केल्यानंतर त्यावर विधान परिषद विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकरांनी प्रतिहल्ला चढवला आहे. आजची शिवसेना पूर्णपणे उपऱ्यांचे वर्चस्व असणारी आहे. आपण आपल्या पक्षात असणारी उपऱ्यांची संख्या आणि भाजपमध्ये असलेल्या उपऱ्यांची संख्या याची आकडेवारी जनतेसमोर येऊ द्या, असे थेट आव्हान दरेकर यांनी राऊतांना दिले आहे.



उदय सामंत मूळचे शिवसैनिक आहेत का? अब्दुल सत्तार १९६६चे सैनिक आहेत का? शंकरराव गडाख कधी झाले शिवसैनिक? प्रियांका चतुर्वेदी खासदार आहेत, ऊर्मिला मातोंडकर कोण आहेत? अर्धे मंत्रिमंडळ उपऱ्यांनी भरलेले असताना भाजपवर उपऱ्यांना घेता, असा आरोप करणे किती संयुक्तिक आहे, असा सवाल दरेकर यांनी केला आहे.

महाविकास आघाडी सरकारची नाचक्की होत आहे. त्यामुळे खुद्द शरद पवारांनाही रोज झालेल्या त्याच त्याच विषयांसाठी पत्रकार परिषदा घ्याव्या लागत आहेत. संजय राऊत यांनी पुन्हा गरळ ओकण्याचा प्रयत्न केला आहे. चर्चा करून चोथा झालेल्या ईडी, सीबीआय यंत्रणा गैरवापराची ढोलकी वाजवून लोकांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा हा नियोजनबद्ध कार्यक्रम दिसतोय, असेही दरेकर म्हणाले.

कलम ३७० हटवूनही जम्मू-काश्मीरमध्ये सुधारणा होऊ शकली नाही, असे संजय राऊत म्हणाले. एकीकडे ते म्हणतात कलम ३७० हटवल्याचा आम्हाला अभिमान आहे. मग ते कलम काढले ही चूक झाली का? तुम्ही जम्मू-काश्मीरच्या सुरक्षेची काळजी करू नका. देशाचे गृहमंत्री अमित शाह सक्षम आहेत. चिनी आक्रमण, काश्मीरची सुरक्षा, सर्जिकल स्ट्राईकसारखी कारवाई करण्याची धमक असल्याचे त्यांनी दाखवून दिले आहे, असे दरेकर यांनी सांगितले.

राऊतांना माझी विनंती आहे की, महाराष्ट्रातील महिला सुरक्षा, खून, आत्महत्या अशा घटनांविषयी राज्य सरकारला सल्ला देऊन काही कारवाई झाली, तर आम्ही आपले अभिनंदन करू, असेही दरेकर म्हणाले.

# पनवेलमध्ये शनिवारी 'दिलखुलास गप्पा'

## संवादमालेत शरद पोंक्षे गुंफणार तिसरे पुष्प



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक सेलच्या वतीने संवादमाला पुष्प ३ अंतर्गत प्रसिद्ध अभिनेते तथा लेखक शरद पोंक्षे यांच्याशी दिलखुलास गप्पा कार्यक्रमाचे पनवेलमध्ये आयोजन करण्यात आले आहे.

पनवेल शहरातील ज्येष्ठ नागरिक संघ सभागृहात येत्या शनिवारी (दि. २३) सायंकाळी ६ वाजता हा कार्यक्रम होणार असून एबीपी माझा वृत्तवाहिनीचे निवेदक दीपक पळसुळे त्यांची मुलाखत घेणार आहेत. या वेळी 'मी आणि नथुराम' या पुस्तकाच्या आठव्या आवृत्तीचे लोकार्पण करण्यात येणार आहे.

कोरोना नियमांचे पालन करून होणाऱ्या या कार्यक्रमासाठी प्रवेश निःशुल्क असून प्रवेशिका अनिवार्य व मर्यादित आहेत. अधिक माहितीसाठी भाजप सांस्कृतिक सेल उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन (९०२९५८०३४३) किंवा गणेश जगताप (९८७०११६९६४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# रायगडात पहिल्या टप्प्यामध्ये २४ भात खरेदी केंद्र सुरू होणार

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात भातकापणीच्या कामाला सुरुवात झाली आहे. आठवडाभरात जिल्ह्यात टप्प्याटप्प्याने २४ भात खरेदी केंद्र सुरू करण्यात येणार आहेत. या केंद्रांवर सर्वसाधारण प्रतीचा भात एक हजार ९४० रुपये प्रति क्विंटल दराने विक्री करता येणार आहे, तसेच या वर्षीही राज्य शासनाकडून अतिरिक्त दिल्या जाणाऱ्या बोनसची रक्कम शेतकऱ्यांना दिली जाणार आहे.

जिल्ह्यात भात खरेदी केंद्र सुरू करा, अशी मागणी शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली होती. त्यानुसार पुढील आठवड्यापासून भात खरेदी सुरू करण्यात येणार असल्याची माहिती मार्केटिंग फेडरेशनकडून देण्यात आली. शेतकऱ्यांना भाताची विक्री शासकीय खरेदी केंद्रावर करायची असून त्यासाठी केंद्रावर आगाऊ ऑनलाईन नोंदणी सुरू करण्यात आली आहे. **(सविस्तर वृत्त पान ५ वर..)**

### रवींद्र चव्हाणांनी घेतला होता पुढाकार

*रायगडातील शेतकऱ्यांना भातविक्रीसाठी जास्तीत जास्त केंद्र उपलब्ध व्हावीत तसेच त्यांना योग्य तो हमी भाव मिळावा यासाठी जिल्ह्याचे तत्कालीन पालकमंत्री व आताचे आमदार रवींद्र चव्हाण यांनी पुढाकार घेतला होता. यासाठी त्यांनी भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या साथीने आढावा घेत कार्यवाही केली होती.*



**पनवेल : लायन्स डिस्ट्रिक्ट ३२३१मार्फत भिंगारवाडी येथे अन्नवाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, सरचिटणीस राजेंद्र पाटील, जि. प. सदस्य अमित जाधव, पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष आनंद ढवळे, आप्पा भागीत आदी उपस्थित होते.** (वृत्त पान ३ वर..)

# राज ठाकरेंमध्ये बाळासाहेबांची छबी दिसते -गुरू माँ कांचन गिरी

**मुंबई : प्रतिनिधी**

अयोध्येच्या साध्वी गुरू माँ कांचन गिरी यांनी सोमवारी (दि. १८) मुंबईत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची त्यांच्या कृष्णकुंज निवासस्थानी भेट घेतली. यानंतर माध्यमांशी संवाद साधताना गुरू माँ कांचन गिरी यांनी राज ठाकरे यांचे कौतुक केले.

राज ठाकरेंमध्ये बाळासाहेब ठाकरेंची छबी दिसते. ते जे बोलतात ते करून दाखवतात, असे गिरी यांनी या वेळी म्हटले.



राज ठाकरे यांचा डिसेंबर महिन्यात अयोध्येत येण्याचा मानस आहे. आम्ही त्यांचे स्वागत करू. राज ठाकरे यांनी हिंदू राष्ट्र मजबूत करण्यासाठीच्या कार्याला हातभार लावावा, तसेच हिंदुत्वाच्या मुद्द्यावर मनसेने भाजपसोबत जायला हवे. सर्व हिंदूंनी एकत्र यायला हवे, असेही त्या म्हणाल्या.

### कोरोना लसीकरणासंदर्भात नागरिकांसाठी सूचना

**पनवेल महापालिका क्षेत्रातील कोणत्याच लसीकरण केंद्रावर मंगळवार, दि. १९ ऑक्टोबर २०२१ रोजी कोविड प्रतिबंधक लसीकरण होणार नाही, याची नागरिकांनी नोंद घ्यावी.**

# राज्य सरकारचे एकतरी काम पारदर्शक झाले पाहिजे

## शिक्षण राज्यमंत्री बच्चू कडू यांचा सरकारला घरचा आहेर



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याच्या आरोग्य विभागातील भरती प्रक्रियेवरून शिक्षण राज्यमंत्री बच्चू कडू यांनी सडकून टीका केली आहे. या सर्व परीक्षा राज्य लोकसेवा आयोगाकडूनच घेतल्या पाहिजेत. खरंतर सर्व जाती-धर्मातील सामान्य गरिबांचे विद्यार्थी एवढी मेहनत घेतात. रात्रंदिवस रक्ताचं पाणी करून बिचारे अभ्यास करतात, त्यामुळे राज्य सरकारचे एकतरी काम अतिशय पारदर्शक झाले पाहिजे, असे म्हणत राज्यमंत्री बच्चू कडू यांनी महाविकास आघाडी सरकारला घरचा आहेर दिला आहे. आरोग्य विभागाच्या परीक्षेबाबत झालेल्या गोंधळामुळे संपूर्ण महाराष्ट्रात विद्यार्थ्यांमध्ये नाराजीचा सूर आहे. ही परीक्षा पारदर्शीपणे व्हावी यासाठी ही परीक्षा एमपीएससीमार्फत घेण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी या वेळी केलीय.

आरोग्य विभागाच्या परीक्षेचे काम न्यास या कंपनीला देण्यात आलेले आहे. न्यास ही कंपनी ब्लॅक लिस्ट आहे, तरीही याच कंपनीला काम का देण्यात आले, असा प्रश्न राज्यातील विद्यार्थी विचारत आहेत. राज्यमंत्री बच्चू कडू यांनी देखील अशा कंपनीला काम देण्यात येऊ नये आणि राज्य सरकारने पारदर्शीपणे परीक्षा घ्यावी, अशी मागणी केलीय. सगळ्या जाती-धर्माचे विद्यार्थी रक्ताचे पाणी करून प्रामाणिकपणे परीक्षेची तयारी करतात. त्यामुळे या परीक्षेत घोळ होऊ नये, असेही राज्यमंत्री बच्चू कडू यांनी सांगितले.

राजेश टोपे यांच्याबद्दल आम्हाला कुठलाही संभ्रम नाही, पण या परीक्षेत मागेही घोळ झाला, परीक्षा रद्द झाली. अमरावतीवाल्याला नाशिक, नाशिकवाल्याला नांदेड हे जे काही घोळ झालेत ते निश्चितच दुर्दैवी आहेत. या परीक्षेत कुठलाही पैशाचा व्यवहार न होता एमपीएससीमार्फत या परीक्षा घेतल्या पाहिजे. असे केले तरच गरीब गुणवत्तापूर्ण विद्यार्थ्यांना याचा फायदा होईल, असे मतही बच्चू कडू यांनी व्यक्त केले.

बच्चू कडू यांनी या वेळी ब्लॅकलिस्ट कंपनीलाच आरोग्य भरतीचे काम देण्यावरून तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, न्यास ही कंपनी ब्लॅकलिस्ट असताना देखील याच कंपनीला या परीक्षेचे काम देणे हे दुर्दैवी आहे. अशा कंपनीला काम देण्याचे कारण काय? याबद्दल माझ्या मनात खंत आहे. सर्व गरीब मुलांना हीच अपेक्षा असते की खूप अभ्यास करू आणि नोकरी मिळवू. आमच्याकडे जेव्हा नोकरीसाठी मुलं येतात तेव्हा आम्ही त्यांना अभ्यास कर मेरिटमध्ये ये असे सांगतो, मात्र असे म्हणायचे दिवस संपले की काय अशी अवस्था आहे.

# पालिका क्षेत्रातील खेळाची मैदाने, उद्याने खुली करा


## नगरसेविका नेत्रा पाटील यांची मागणी

**खारघर : रामप्रहर वृत्त**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या वतीने अनेक ठिकाणी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून सार्वजनिक ठिकाणे बंद करण्यात आली होती. सध्या कोरोनाचा प्रादूर्भाव कमी होत असून अनलॉकच्या धर्तीवर खेळाची मैदाने, उद्याने खुली करण्यात यावीत, अशी मागणी नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांनी निवेदनाद्वारे पालिका आयुक्तांना केली आहे.

शासनाच्या वतीने कोरोनापासून बचावासाठी लसीकरण करण्यात आले असून पनवेल महानगरपालिका हद्दीत जवळपास ९० टक्के नागरिकांना लसकवच प्राप्त झाल्याचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचे म्हणणे आहे. सध्यस्थितीत सर्वच सार्वजनिक ठिकाणे खुली करण्यात आली आहेत. सर्व नागरिकांची, तसेच ज्येष्ठ नागरिकांसह तरुण वर्गाची मागणी आहे की आपल्या पनवेल महानगरपालिका हद्दीतील खेळाची मैदाने, उद्याने ही लवकरात लवकर खुली करण्यात यावी. खारघर येथील सर्वात मोठे व सर्वांचेच विशेषतः लहान मुलांचे आकर्षण असलेले सेंट्रल पार्कही खुले करण्यात यावे अशी रहिवाशांची इच्छा आहे, अशी लेखी मागणी नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांनी आयुक्त गणेश देशमुख यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# गुरमीत राम रहीमला जन्मठेपेची शिक्षा



**पंचकुला : वृत्तसंस्था**

प्रसिद्ध रणजीत सिंह हत्या प्रकरणात १९ वर्षांनंतर पंचकुलाच्या विशेष सीबीआय कोर्टाने सोमवारी डेरा सच्चा सौदाचे गुरमीत राम रहीमसह चार दोषींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

न्यायालयाने राम रहीमला ३१ लाखांचा दंड ठोठावला, तर इतर चार दोषींना प्रत्येकी ५० हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. दंडातील अर्धी रक्कम पीडित कुटुंबाला दिली जाईल. या निर्णयाविरोधात राम रहीम उच्च न्यायालयात जाणार आहे. राम रहीम आणि इतरांना २००२ मध्ये डेराचे माजी व्यवस्थापक रणजीत सिंह यांच्या हत्येप्रकरणी दोषी ठरवण्यात आले होते. शिक्षा घोषित करण्यापूर्वी सुरक्षा व्यवस्था कडक करत हरियाणाच्या पंचकुला जिल्ह्यात कलम १४४ लागू करण्यात आले आहे.

ऑगस्ट २०१७चा हिंसाचार पाहता, सुनावणीपूर्वी किंवा राम रहीमशी संबंधित कोणत्याही प्रकरणात शिक्षा घोषित करण्यापूर्वी सुरक्षा यंत्रणा वाढवली जाते. २०१७ मध्ये बलात्कार प्रकरणात राम रहीमला दोषी ठरवल्यानंतर हिंसाचारात ३६ जणांचा मृत्यू झाला होता. गेल्या सुनावणीदरम्यान सीबीआयने न्यायालयाकडे डेरा प्रमुखांना फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली होती. त्याच वेळी, राम रहीमने स्वतः व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे रोहतक तुरुंगातून दयेची विनंती केली होती. दोन अनुयायांवर बलात्कार केल्याप्रकरणी राम रहीम २० वर्षांची शिक्षा भोगत आहे. दरम्यान, आता पुन्हा त्याला हत्या प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे.

# पश्चिम बंगालमध्ये भाजप नेत्याची गोळ्या झाडून हत्या

**कोलकाता : वृत्तसंस्था**

पश्चिम बंगालमध्ये भाजपच्या युवा नेत्याची हत्या झाली आहे. पक्षाचे युवा शाखा नेते मिथुन घोष यांची उत्तर दिनाजपूरच्या इटाहारमध्ये हल्लेखोरांनी गोळ्या झाडून हत्या केली, अशी माहिती बंगालचे भाजप नेते सुवेंदू अधिकारी यांनी दिली, तर मिथुन घोष यांच्या हत्येमागे तृणमूल काँग्रेसचा हात असल्याचा आरोप अधिकारी यांनी केला आहे. मिथुन घोष यांची हत्या करणाऱ्यांना त्यांची वेळ आल्यावर योग्य कारवाई केली जाईल, असा इशारा सुवेंदू अधिकारी यांनी दिला आहे.

सोमवारी एका ट्विटमध्ये सुवेंदू अधिकारी म्हणाले, बीजेवायएम व्हीपी उत्तर दिनाजपूर जिल्ह्यातील मिथुन घोष यांची इटाहार येथे हल्लेखोरांनी गोळ्या घालून हत्या केली आहे. ही हत्या तृणमूल काँग्रेसने घडवून आणली आहे. रक्तरंजित असामाजिक शिकारी कुत्रे ज्यांनी आपल्या मालकाच्या आदेशाचे पालन करत मिथुन घोष यांची हत्या केली. त्यांची वेळ आल्यावर त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असा इशारा अधिकारी यांनी मारेकऱ्यांना दिला आहे.

# साडेबारा टक्के योजनेतील जमिनींचे वाटप

**नवी मुंबई : सिडको वृत्त**

सिडको महामंडळाने साडेबारा टक्के योजनेंतर्गत नवी मुंबईतील प्रकल्पबाधितांना किंवा त्यांच्या वारसांना करण्यात येणारे जमिनीचे वाटप येत्या दीड वर्षांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले आहे. तसेच नागरिकांच्या सोयीसाठी म्हणून सिडकोचे मुख्यालय असलेल्या, सिडको भवन येथील सातव्या मजल्यावरील साडेबारा टक्के योजना कार्यालयाचे स्थलांतर तळमजल्यावर करण्यात आले आहे. या विभागाचे उद्घाटन सोमवारी (दि. १८) सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी सहव्यवस्थापकीय संचालक अश्विन मुद्गल, एस. एस. पाटील, कैलास शिंदे, मुख्य भूमी व भूमापन अधिकारी अजिंक्य पडवळ, अन्य अधिकारी आणि कर्मचारी देखील उपस्थित होते.



**दीड वर्षांत पूर्ण करण्याचा सिडकोचा इरादा**

नवी मुंबई विकसित करण्याकरिता सिडकोकडून स्थानिकांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या होत्या. या प्रकल्पबाधितांना त्यांच्या संपादित केलेल्या जमिनीचा योग्य मोबदला मिळावा याकरिता साडेबारा टक्के ही अभिनव योजना अस्तित्वात आली. या योजनेंतर्गत नवी मुंबई प्रकल्पबाधितांना मोबदला म्हणून त्यांच्या संपादित केलेल्या जमिनीच्या साडेबारा टक्के विकसित जमीन देण्यात येते. सिडकोकडून अत्यंत पारदर्शक व नियोजनबद्धरीत्या ही योजना राबविण्यात येऊन, आजतागायत नवी मुंबई क्षेत्रातील ठाणे आणि रायगड जिल्ह्यांतील बहुतांशी प्रकल्पबाधितांना किंवा प्रकल्पबाधित व्यक्ती हयात नसल्यास त्यांच्या वारसांना जमिनींचे वाटप करण्यात आले आहे. उर्वरित प्रकल्पबाधितांना या योजनेंतर्गत जमीन वाटपाची प्रक्रिया येत्या दीड वर्षात सिडकोकडून पूर्ण करण्यात येणार आहे.

सिडकोकडून द्रोणागिरी नोडमधील जमीन संपादित करण्याचे काम सुरू असून सदर जमिनींच्या मोबदल्यात तेथील प्रकल्पबाधितांना जासई येथे विकसित भूखंड प्रदान करण्यात येतील. यासाठी जासई येथे उच्च दर्जाच्या पायाभूत सुविधा विकसित करण्याचे काम वेगाने सुरू आहे. साडेबारा टक्के योजने संदर्भातील कामांसाठी सिडको मुख्यालयात येणाऱ्या नागरिकांना सोयीचे पडावे म्हणून, या योजनेचे सिडको भवन इमारतीत असलेले सातव्या मजल्यावरील कार्यालय तळमजल्यावर स्थलांतरीत करण्यात आले असून नवीन कार्यालय हे सुसज्ञ व अधिक प्रशस्त जागेत आहे. कार्यालयाबाहेर आसन व्यवस्था, दिव्यांग व्यक्तींसाठी रॅम्प इ. सुविधा आहेत. यामुळे सर्वसामान्य नागरिकांसह ज्येष्ठ व दिव्यांग नागरिकांनाही हे नवीन कार्यालय अधिक सोयीचे असणार आहे.

**नवी मुंबई प्रकल्पबाधितांना संपादित जमिनींकरिता योग्य मोबदला देण्यासह त्यांचे जीवनमान उंचावण्याकरिता साडेबारा टक्के योजना ही अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली आहे. येत्या दीड वर्षात या योजनेंतर्गत बाकी असलेले जमिनीचे वाटप पूर्ण करण्याचे उद्दिष्ट सिडकोने आखले आहे. याकरिता सदर योजनेतील प्रकरणे अधिक वेगाने मार्गी लावण्यात येणार आहेत.**

**-डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको महामंडळ**

# ठाण्यात शिवसेनेत सुंदोपसुंदी

## रामदास कदम यांच्या समर्थकांकडून बॅनरबाजी

**ठाणे : प्रतिनिधी**

राज्याचे परिवहन मंत्री अनिल परब यांच्या विरोधात भाजपच्या नेत्यांना रसद पुरवल्याच्या आरोपामुळे शिवसेना नेते रामदास कदम वादात अडकले आहेत. कथित ऑडिओ क्लिपमुळे मुख्यमंत्री आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची नाराजी ओढवल्याने दसरा मेळाव्यातही कदम यांची अनुपस्थिती होती. प्रकृती अस्वास्थ्यामुळे हजर नसल्याचे कारण कदम यांनी दिले, मात्र दसरा मेळाव्यानंतर रामदास कदम यांच्या समर्थनार्थ ठाणे शहरात बॅनर झळकावण्यात आले आहेत.




'कालपर्यंत राडा झाल्यावर आम्हाला फोन करणारे लोक... आज आमचीच सुपारी द्यायला निघाले आहेत. त्यांना पुन्हा एकदा आठवण करून देतो बाप बापच असतो,' या अशयाचा मजकूर असलेला बॅनर ठाण्यातील नितीन कंपनी चौकात लावण्यात आला आहे. शिवसेना पक्षाचा बॅनरवर उल्लेख नसला, तरी शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे, पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, आनंद दिघे आणि एकनाथ शिंदे यांचे या बॅनरवर फोटो लावण्यात आले आहे.

रामदास कदम यांच्या फोटोमागे डरकाळी फोडणाऱ्या वाघाचे चित्र लावण्यात आले आहे. कट्टर समर्थक विठोबा कदम आणि रवी आमले या दोघांचे फोटो आणि नावे या बॅनरवर आहेत. कोकणचा ढाण्यावाघ असा उल्लेख करून त्यावर लिहिलेल्या मजकुरावरून ठाण्यात चर्चेला उधाण आलं आहे. यामध्ये उल्लेख केलेले राडा झाल्यानंतर फोन करणारे आणि सुपारी देणारी मंडळी नेमकी कोण? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. हा बॅनर नेमका कोणाला उद्देशून लिहण्यात आला आहे? याबद्दलही कुतूहल निर्माण झाले आहे.

दरम्यान, या संदर्भात बॅनरवरील रवी आमले यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सामान्य शिवसैनिक असल्याचं स्पष्ट केलं. विरोधकांकडून रामदास कदम यांच्या विरोधात षडयंत्र रचले जात असून त्यांना राजकारणातून संपवण्याचा डाव मांडला जात आहे. सामान्य शिवसैनिक म्हणून ही गोष्ट खटकल्याने याबद्दलच्या भावना व्यक्त करण्यासाठी शहरात हे बॅनर लावण्यात आल्याचा दावा आमले यांनी केला आहे. कोणतंही पद नसले तरी शिवसैनिक हीच आमची ओळख असून शिवसेनेच्या महत्त्वाच्या नेत्यावर होत असलेल्या आरोपामुळे त्यांच्या समर्थनार्थ हे बॅनर लावल्याचा दावा त्यांनी केला.



**मुंबई : वनवासी कल्याण आश्रम मुंबई महानगरतर्फे खडकपाडा आरे कॉलनी, गोरेगाव येथे दिनदर्शिका २०२२चा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून रा. स्व. संघाचे मुंबई महानगर संघचालक सुरेश भगेरिया, विशेष अतिथी म्हणून एकात्मिक आदिवासी विकास योजनेच्या मुंबई महानगर प्रकल्प अधिकारी सुप्रिया चव्हाण उपस्थित होते. या वेळी अखिल भारतीय वनवासी कल्याण आश्रमाचे नगरीय प्रमुख भगवान सहाय यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.**

# ऐरोली खाडीकिनारी प्रदूषणामुळे मासे मृत

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

मागच्या आठवड्यात गोठीवली भागात मासे मृत पावल्याची घटना ताजी असताना आता ऐरोली खाडीकिनारी असलेल्या तलावातही दररोज शेकडो मासे मृत पावत आहेत. पाण्यात होणाऱ्या प्रदूषणामुळे हे प्रकार होत असल्याचा आरोप स्थानिक मच्छीमारांनी केला. यामुळे त्यांच्यासमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे.

औद्योगिक क्षेत्रात असलेल्या लहान-मोठ्या रासायनिक कारखान्यांतील दूषित पाणी थेट खाडीत सोडले जात असल्याने सलग चार दिवसांपासून ऐरोली आणि दिवा खाडीत शेकडो मासे मृत पावत असल्याचे मच्छिमारांचे म्हणणे आहे. यामुळे खाडीकिनारी असलेल्या तलावात मृत माशांचा खच पडला आहे. खाडीतील प्रदूषण वाढल्याने पाण्याचे तापमान वाढते आणि ऑक्सिजनचे प्रमाण कमी होते. यामुळे मासे मृत पावत असल्याचे स्थानिक मच्छिमार सांगत आहेत. मृत



पावलेल्या माशांमध्ये काळा मासा, जिताडा, कोळंबी, बोईस, चिंबोरी, निवट्या अशा विविध प्रकारच्या माशांचा समावेश आहे. हे मासे घणसोली, तळवली, गोठीवली, दिवा कोळीवाडा आणि ऐरोली खाडी परिसरात मोठ्या प्रमाणात आढळतात. दूषित सांडपाणी, दलदल तसेच जैविक कचरा अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये जगणारे हे मासे मृत्युमुखी पडत असल्याची येथील मच्छीमारांची तक्रार आहे.

ऐरोली कोळीवाड्यातील मच्छीमार, ऐरोली कोळीवाडा मच्छीमार सेवा संस्थेचे अध्यक्ष धनाजी पाटील यांच्या खाजण तलावात सलग चार दिवसांपासून शेकडो माशांचा मृत्यू झाल्याने आज त्यांच्या कुटुंबावर बिकट परिस्थिती ओढवली आहे. पावसाळ्यापूर्वी धनाजी पाटील यांनी त्यांच्या खाजण तलावात दीड ते दोन लाख रुपये किमतीची जिताडा आणि बोईस माशांची पिले पैदास होण्यासाठी सोडली होती. मात्र आता शेकडो माशांचा मृत्यू झाला. या भागातील पाण्याची गुणवत्ता घटल्यामुळे हा प्रकार घडत असून यामुळे येथील स्थलांतरित पक्ष्यांच्या जीवितालाही धोका निर्माण झाला आहे, असे पाटील यांनी सांगितले. खाडीच्या पाण्याच्या प्रदूषणाची पातळी मोठी असल्यामुळे या भागात अत्यंत तुरळक मासे आढळतात. अनेक लहान-मोठे मासे मृत्युमुखी पडल्यामुळे उरलेसुरले मासे नष्ट होण्याची शक्यता आहे, असा अंदाजही त्यांनी वर्तवला.

# केरळमध्ये परतीच्या पावसाचा कहर; मृतांचा आकडा ३५वर





**तिरूअनंतपूरम** : केरळमध्ये परतीच्या पावसाने अक्षरश: थैमान घातल्याचे पाहायला मिळत आहे. मुसळधार पाऊस आणि भूस्खलनाच्या घटनांमुळे आतापर्यंत ३५ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळतेय. शिवाय अनेक घरांचे नुकसान झाले आहे.

कोट्टायम जिल्ह्यातील कुट्टीकल आणि इडुक्की जिल्ह्यातील कोक्यारमध्ये मलब्याखाली अडकलेले मृतदेह काढण्याचे काम हाती घेण्यात आले. अचनकोविल नदीच्या किनाऱ्यावर असलेल्या पन्दलमजवळ चेरिकल, पूझिकाडू, मुदियूरकोणम आणि कुरमबाला या परिसराला महापुराचा सामना करावा लागतोय. दरम्यान, हवामान विभागाने २० ते २४ ऑक्टोबरपर्यंत हवामान अधिक खराब होण्याची शक्यता व्यक्त केली आहे.

# निवडक

## पनवेलमधून एक जण बेपत्ता

**पनवेल :** भाजी विक्री करीता जातो, असे सांगून घराबाहेर पडलेला एक व्यक्ती अद्याप घरी न परतल्याने तो हरविल्याची तक्रार तालुका पोलीस ठाण्यात देण्यात आली आहे. अशोक वामन देशेकर (वय ४०, रा. चिंध्रण) यांची उंची पाच फूट दोन इंच, मध्यम बांधा, नाक सरळ, केस काळे असून अंगात सफेद शर्ट व काळी पँट घातली आहे. त्यांना मराठी व हिंदी भाषा अवगत आहे. सोबत एक्सेंट कार नेली आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास तालुका पोलीस ठाणे ०२२२७४५२४४४ किंवा पोलीस हवालदार जी. डी. तांडेल यांच्याशी संपर्क साधावा.



## मंगळसूत्र चोरीप्रकरणी एक अटकेत

**पनवेल :** खांदा वसाहत व नवीन पनवेल परिसरात सोनसाखळी, मंगळसूत्र चोरीच्या घटना घडल्या होत्या. याप्रकरणी खांदेश्वर पोलिसांनी एकास ताब्यात घेतले आहे. खांदेश्वर पोलीस स्टेशन हद्दीत काही दिवसांपूर्वी एका महिलेचे मंगळसूत्र जबरी चोरी झाल्याबाबतचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. याबाबत पोलिसांच्या पथकाने सीसीटीव्ही व रेकॉर्डवरील गुन्हेगार यांची माहिती घेऊन तपास केला. त्यानुसार नुकताच शिक्षा भोगून आलेला आरोपी आकाश गोपाळ गाडे (वय २५, रा. विचुंबे गाव, पनवेल) याला अटक केली. चौकशीत त्याने दोन गुन्हे केल्याची कबुली दिली. यापूर्वीही त्याने विविध गुन्हे केले असून त्याच्याकडून जवळपास ९० हजारांचा चोरीचा माल हस्तगत केला आहे.

## फुंडे हायस्कूलमध्ये वाचन प्रेरणा दिन

**उरण :** रयत शिक्षण संस्थेचे फुंडे येथील तु. ह. वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय येथे भारताचे दिवंगत माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती व त्यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक एस. टी. म्हात्रे यांच्या हस्ते शुक्रवारी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच शनिवारी प्रत्येक वर्गात वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. विद्यालयाचे ग्रंथपाल डी. ए. घरत यांनी केलेल्या नियोजनानुसार सर्व विद्यार्थ्यांना ग्रंथालयातून विद्यार्थी वयोगटानुसार पुस्तकांचे वाटप करण्यात आले. विद्यालयाचे प्राचार्य एम. एच. पाटील, पर्यवेक्षक जे. सी. गोडगे, एस. जी. म्हात्रे ग्रंथालय प्रमुख डी. ए. घरत यांनी प्रत्येक वर्गात जाऊन विद्यार्थ्यांना वाचन प्रेरणा दिनाचे महत्त्व सांगून शुभेच्छा दिल्या.



# सीकेटी महाविद्यालयात विशेष लसीकरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोरोना महामारीचा वाढता प्रादूर्भाव लक्षात घेता बंद करण्यात आलेली महाविद्यालये येत्या बुधवार (दि. २०)पासून सुरू होणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे लसीकरण व्हावे या दृष्टीने राष्ट्रीय सेवा योजना व पनवेल महापालिकेच्या संयुक्त विद्यमाने जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयात विशेष कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरण शिबिराचे सोमवारी (दि. १८) आयोजन करण्यात आले होते.

या शिबिराचे उद्घाटन प्राचार्य डॉ. संजय पाटील यांच्या हस्ते झाले. या वेळी आयक्यूएसीचे समन्वयक डॉ. बाळासाहेब आघाव, कला विभाग प्रमुख डॉ. बाळासाहेब पाटील, भूगोल विभाग प्रमुख डॉ. दीपक नारखेडे, एनएसएस विभाग मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. सूर्यकांत परकाळे, कार्यक्रम अधिकारी प्रा. गणेश साठे, प्रा. आकाश पाटील तसेच पनवेल महापालिकेच्या वतीने डॉ. श्रेयश पाटील व त्यांचे सहकारी उपस्थित होते.



या लसीकरण मोहिमेच्या यशस्वितेसाठी प्रा. सूर्यकांत परकाळे, प्रा. गणेश साठे, प्रा. सत्यजित कांबळे, डॉ. योजना मुनिव, प्रा. सागर खैरनार, प्रा. आकाश पाटील, प्रा. अपूर्वा ढगे यांच्यासह शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या आरोग्यविषयक प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा भाग म्हणून आयोजित विशेष लसीकरण शिबिराचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

## पालिकेतील महिला सफाई कर्मचाऱ्यांचा सन्मान

**खारघर : प्रतिनिधी**

पालिका क्षेत्रातील महिला सफाई कर्मचाऱ्यांना कळंबोली येथील स्वराज्य सांस्कृतिक सेवा मंडळाच्या माध्यमातून सन्मानित करण्यात आले. या वेळी महिला सफाई कर्मचारी यांना सन्मानपत्र, साडी, नारळ, गजरा, गुलाबाचे फूल देऊन सन्मानित करण्यात आले. संसाराचा गाडा हाकताना स्वच्छतादूत म्हणून समाजातील अस्वच्छता दूर करण्याचे काम या महिला नवदुर्गा करीत असल्याने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

आज प्रत्येक क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून कार्यरत आहेत. समाजात महिला आज मोठमोठ्या पदावर कार्यरत आहेत. त्या महिलांच्या तुलनेने या महिलांचे कामदेखील तेवढेच महत्त्वाचे असल्याचे सांगत आम्ही सफाई कर्मचारी म्हणून कार्यरत असलेल्या महिलांना सन्मानित करण्याचा निर्णय घेतला असल्याचे मंडळाच्या पदाधिकारी सोनाली कदम यांनी सांगितले. या वेळी मंडळाचे प्रमुख संयोजक प्रशांत कदम यांनी पालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांची याकरिता योग्य निवड राहील, असे सांगत कोविड काळात जीवाची पर्वा न काम केलेल्या महिला सफाई कामगारांची याकरिता निवड केली. या वेळी आयोजित सोहळ्याला केसरीनाथ पाटील, अमोल बोचरे, नितीन काळे आदी उपस्थित होते.

## लायन्स क्लबतर्फे विविध उपक्रमांचे आयोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लायन्स क्लब ऑफ इंटरनॅशनलचे प्रेसिडेंट डग्लस ॲलेक्सझॅण्डर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्या अंतर्गत पनवेल तालुक्यातील भिंगारवाडी येथे अन्नवाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन रिजन चेअरपर्सन ज्योती देशमाने यांनी केले होते. या वेळी भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

लायन्स डिस्ट्रिक्ट ३२३१ यांच्यामार्फत विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यानुसार लायन्स अन्नपूर्णा महोत्सवांतर्गत एक हजार लोकांना जेवण व कपडे वाटप करण्यात आले. या वेळी भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, सरचिटणीस राजेंद्र पाटील, जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, युवा मोर्चा ग्रामीण तालुका अध्यक्ष आनंद ढवळे, आप्पा भागीत, प्रांतपाल एल. जे. तावरी, नागेश देशमाने, अनिल गरोडीया, जिग्नेश जोशी, रूपेश, मनीष लाडगे, सीमा लाडगे, हेमंत सिंग मेहरा, गायत्री साटम, मीना पोतदार, शोभा गिल्डा, एस. जी. चव्हाण, नमिता मिश्रा, गुंजन सलुजा आदी उपस्थित होते.



## उरणमध्ये आज रस्ते काँक्रीटीकरणाचे भूमिपूजन

**उरण : वार्ताहर**

उरणचे आमदार महेश बालदी, तसेच नगराध्यक्ष सायली म्हात्रे यांच्या प्रयत्नाने उरण नगर परिषद हद्दीतील प्रभाग क्र. ८ मधील सातरहाटी व हरीपांडव पथ (उरण) रस्त्याच्या काँक्रीटीकरणाचा भूमिपूजन समारंभ मंगळवारी (दि. १९) सकाळी ११ वाजता आमदार महेश बालदी यांच्या हस्ते होणार आहे.

या वेळी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, उपनगराध्यक्ष जयविन कोळी, तालुका अध्यक्ष तथा नगरसेवक रवी भोईर, शहर अध्यक्ष तथा नगरसेवक कौशिक शाह, नगरसेविका प्रियंका पाटील, दमयंती म्हात्रे, नगरसेवक धनंजय कडवे, राजेश ठाकूर, सर्व नगरसेवक, नगरसेविका, नागरिक आदी उपस्थित राहणार आहेत.

## सामाजिक उपक्रमाच्या माध्यमांतून 'एमजीएम'च्या डॉक्टरांची रीयुनियन

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथील एम.जी.एम. संस्थेच्या १९९२ बॅचच्या डॉक्टरांची रीयुनियन नुकतीच लोणावळा येथे झाली. रीयुनियन म्हणजे फक्त भेटीगाठ, मौजमजा न करता समाजासाठी काहीतरी करावे या हेतूने या ग्रुपतर्फे काही सामाजिक उपक्रम राबविण्यात आले आहेत.

याची सुरुवात स्नेहकुंज आधारगृह, नेरे, पनवेल या वृद्धाश्रमास दसऱ्याच्या दिवशी कडधान्य, जीवनोपयोगी वस्तू, तसेच मिठाई वाटप करून झाली. या वेळी ग्रुपतर्फे डॉ. अमोल मुंबईकर, डॉ. प्रियांका प्रसाद उपस्थित होते. यापुढे या ग्रुपतर्फे मोफत आरोग्य शिबिर, जनजागृती तसेच इतरही उपक्रम राबविण्याचा मानस डॉ. देवल दोशी यांनी बोलून दाखवला.




## ज्यांच्यासोबत महिला त्यांच्यासोबतच विजय -आ. मंदाताई म्हात्रे

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

राजकीय व सामाजिक जीवनात महिलांची ताकद लक्षणीय आहे. माझ्या निवडणुकीच्या अनुभवावरून सांगते, निवडणुकीत महिला वर्ग माझ्यासोबत सुरुवातीपासून शेवटपर्यंत होता आणि आजही आहे. महिला जिकडे, सर्व घर तिकडे असते. घरातील पुरुष कोठेही फिरले तरी घरात शेवटी त्यांना महिलांचेच ऐकावे लागते. त्यामुळे महिला ज्यांच्यासोबत, विजयही त्यांच्यासोबतच असल्याचे प्रतिपादन बेलापूरच्या आमदार मंदाताई म्हात्रे यांनी केले.

सानपाड्यामधील भाजपचे युवा नेते पांडुरंग आमले यांनी साईभक्त महिला फाऊंडेशनच्या माध्यमातून प्रभाग ७६ मधील विधवा महिलांसाठी सुरू केलेल्या 'साईभक्त स्त्री आधार योजने'चा शुभारंभ आमदार मंदाताई यांच्या हस्ते झाला. नवरात्रोत्सव काळात घेतलेल्या विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरण आमदार मंदाताई म्हात्रे आणि भाजपचे आयटी सेल संयोजक सतीश निकम यांच्या हस्ते करण्यात आले. पांडुरंग आमलेंनी कोरोना महामारीच्या काळात उल्लेखनीय कार्य केल्याचे सांगत त्यांच्या कार्याचा म्हात्रे यांनी भाषणात गौरव केला.

या वेळी उत्तर भारतीय मोर्चाचे अध्यक्ष राजेश राय, माजी नगरसेविका दमयंती शेवाळे, आबा जगताप, श्रीमंत जगताप, शशी नायर, निलेश वर्पे, देवनाथ म्हात्रे, राजेश गायकवाड, विश्वास कणसे, प्रशांत सणस, सुनील शिंदे, नाना शिंदे, दीपिका बाम्हणे, आज्ञा गव्हाणे, नीता आंग्रे, सुलोचना निंबाळकर आदी उपस्थित होते.




## पोयंजेत आधार कार्ड शिबिर उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नाने उरण विधानसभा मतदारसंघात आधार कार्ड शिबिराचे आयोजन करण्यात आले असून त्या अंतर्गत पोयंजे येथे सोमवारी (दि. १८) झालेल्या शिबिरात १५०हून अधिक नागरिकांनी लाभ घेत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.


उरणचे आमदार महेश बालदी यांच्या मागणी व पाठपुराव्याने महसूल विभाग पनवेल यांच्यातर्फे महास्वराज अभियान अंतर्गत आधारकार्ड शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने पोयंजे येथे आधारकार्ड शिबिराचे आयोजन करण्यात आले. या वेळी भाजपचे पोयंजे पंचायत समिती विभागीय अध्यक्ष प्रवीण ठाकूर, माजी तालुकाध्यक्ष तानाजी खंडागळे, आशाताई म्हसकर, ग्रामपंचायत सदस्य मंदार चोरघे, रोहिदास चोरघे, पोयंजे अध्यक्ष अशोक भोईर, दीपक भोईर, कल्पेश गायकर, केशव ठाकूर, प्रदीप ठाकूर, मंडल अधिकारी प्रभाकर नाईक, तलाठी रुपाली नाखवा, प्रकाश पडवळ, अंगणवाडी सेविका जयश्री चोरघे यांच्यासह कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते. या शिबिरात नवीन आधारकार्ड काढणे, आधार कार्ड दुरुस्ती करणे, संपर्क क्रमांक लिंक करणे आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आले. या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. त्यामुळे एक दिवसात हे शिबिर पूर्ण न झाल्याने मंगळवार, दिनांक १९ ऑक्टोबरलाही आधार कार्ड शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

## 'अभासअ' सभेच्या अध्यक्षपदी प्रा. आर. बी. पाटील यांची निवड

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पुणे येथील साने गुरुजी स्मारकातील मध्यवर्ती कार्यालयात अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभेची वार्षिक सर्वसाधारण सभा झाली. या वेळी नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून, राष्ट्रीय अध्यक्षपदाची जबाबदारी रसायनी येथील पिल्ले महाविद्यालयाचे माजी प्राचार्य प्रा. रमेश भालचंद्र उर्फ आर. बी. पाटील यांच्याकडे देण्यात आली आहे.

ज्येष्ठ समाजवादी विचारवंत रावसाहेब कसबे, महाराष्ट्राचे माजी गृहमंत्री दिवंगत भाई वैद्य, माजी शिक्षक आमदार कै. जयवंत ठाकरे अशा दिग्गजांनी पदभार सांभाळलेल्या संघटनेचे नवनिर्वाचित अध्यक्ष हे रायगड जिल्ह्यातील आर. बी. पाटील यांच्या रूपाने मिळाल्याने रायगडसह महाराष्ट्रातील विविध राजकीय, सामाजिक क्षेत्रांतील मंडळींकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.



## उरण डाऊर नगरात लसीकरण शिबिर



**उरण : वार्ताहर**


आमदार महेश बालदी यांच्या सहकार्याने उरण तालुक्यातील डाऊर नगर येथील साईबाबा मंदिर येथे चाणजे ग्रुप ग्रामपंचायत सदस्य सोनाली जयेश ठाकूर, सागर वाघमारे व भाजपच्या प्रयत्नाने कोविशिल्ड लसीकरण करण्यात आले.

शिबिरात सुमारे १५० नागरिकांचे लसीकरण करण्यात आले. या वेळी जयेश ठाकूर, प्रशांत माळी, अमित पाटील, सुधिर म्हात्रे, अक्षय पाटील, मंगेश पाटील, सुनील पाटील, प्रथमेश भगत, भाजप कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

## दासभक्तांकडून झुडपे, गवतांची सफाई

**उरण : प्रतिनिधी**

चिरनेर-विंधणे महामार्गाच्या जवळ असलेल्या वन क्षेत्रात ओसाड टेकडीवर विविध जातींच्या झाडांची लागवड व संवर्धन करण्याचे काम डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने उरण तालुक्यातील दासभक्तांनी हाती घेतले आहे. या झाडांच्या अवतीभोवती पावसाळ्यात वाढणारी झुडपे आणि गवतामुळे उन्हाळ्याच्या दिवसात आग लागण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे येथील वृक्ष जळून नष्ट होणार नाहीत, याची खबरदारी म्हणून उरण तालुक्यातील दासभक्तांनी काल झाडांच्या भोवती वाढलेली झुडपे आणि गवत काढण्याचे काम हाती घेतले आहे.



या परिसरातील नागरिकांना, पशूपक्ष्यांना मोकळा श्वास घेता यावा, तसेच जंगलातील पशूपक्ष्यांना अन्न उपलब्ध व्हावे यासाठी उरण तालुक्यातील दासभक्तांनी डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडाच्या माध्यमातून चिरनेर-विंधणे महामार्गावरील ओसाड टेकडीवर विविध जातींच्या झाडांची लागवड करण्याचा संकल्प केला आणि पद्मश्री आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली आंबा, काजू, फणस, जांभूळ, पेरू व इतर विविध जातींच्या झाडांची लागवड केली. दासभक्तांच्या या समाजाभिमुख कार्याचा आदर्श घेऊन सामाजिक संस्था, विविध पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी सहभाग घेऊन हातभार लावला, तर गावागावांतील ओसाड टेकडीवर नंदनवन फुलण्यास वेळ लागणार नाही, अशी प्रतिक्रिया जनमानसात व्यक्त केली जात आहे.

## संपादकीय

# आनंदाची लाट

कोरोना महासाथीच्या दोन लाटांमध्ये जीवघेणे भोग भोगल्यानंतर फार दिवसांनी एक आनंदाची लाट मुंबईकरांवर चालून येऊ पाहात आहे. गेल्या सुमारे दीड वर्षामध्ये प्रथमच मुंबई महानगरीत रविवारी एकाही कोरोना मृत्यूची नोंद झाली नाही. योगायोग असा की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लसीकरणाचा राष्ट्रव्यापी कार्यक्रम जाहीर केला त्या मोहिमेचा २७५वा दिवस रविवारी उजाडला. याचा अर्थ पावणे तीनशे दिवसांनंतर कोरोना विषाणूविरुद्धच्या युद्धात सुस्पष्ट यश आपल्याला दिसून आले.

**गेल्या वर्षी मार्च महिन्याच्या २६ तारखेला कोरोनाचा एकही रुग्ण दगावला नव्हता. त्यानंतर एकही दिवस असा गेला नाही की कुणाच्या मृत्यूची बातमी कानावर आली नाही. जिवाचा थरकाप उडवणारे ॲम्ब्युलन्सचे भोंगे आजही ऐकू येतात, परंतु अशा आवाजाची सर्वसामान्यांना आता जणू सवय झाली आहे. मुंबई आणि लगतच्या परिसरामध्ये कोरोनाचा प्रादूर्भाव आता बराच कमी झाला आहे. संपूर्ण राज्यात जेमतेम पंधराशे ते सतराशे रुग्ण आढळून येत आहेत. रविवारी मुंबईमध्ये एकाही कोरोना मृत्यूची नोंद झाली नसली, तरी ३६७ नवे रुग्ण आढणून आले आहेत. गेल्या २६ मार्चला अशाच प्रकारची नोंद झालेली दिसते. मुंबई महानगरीमध्ये गेल्या वर्षी ११ मार्च रोजी कोरोनाचा पहिला रुग्ण आढळला होता आणि त्यानंतर ६ दिवसांनी म्हणजेच १७ मार्च रोजी पहिला कोरोना मृत्यू नोंदला गेला होता. पावणे तीनशे दिवसांनंतर पुन्हा त्याच स्थितीला आपण येऊन पोहोचलो आहोत. हे सारे श्रेय कोव्हिड योद्ध्यांना जाते. डॉक्टर्स, नर्सेस, वॉर्डबॉय, ॲम्ब्युलन्सचे चालक, कोरोना रुग्णांना मदत करणाऱ्या अनेक सेवाभावी संस्था या साऱ्यांनी मिळून केलेल्या प्रयत्नांचे हे यश आहे. कोरोना यशस्वीपणे रोखल्याबद्दल राज्यातील सत्ताधारी स्वत:ची पाठ थोपटून घेतीलही, परंतु त्यात फारसे तथ्य नाही हे जनतेला चांगलेच ठाऊक आहे. कारण कोरोना काळामध्ये या सत्ताधाऱ्यांनी काय काय घोळ घातले ते साऱ्यांनाच ठाऊक आहे. अर्थात त्याची जंत्री देण्याची ही वेळ नव्हे. समाधानाचा सुस्कारा टाकण्याचा हा क्षण आहे. लसीकरणाने देखील आता चांगला जोर पकडलेला दिसतो. येत्या काही दिवसांमध्ये सारे निर्बंध उठवण्याचा विचार राज्य सरकार करत असल्याच्या बातम्या झळकत आहेत, परंतु तसे होण्याची शक्यता कमी वाटते. अजून काही काळ तरी कोरोना प्रतिबंधक नियम आपल्याला पाळावेच लागतील कारण तिसऱ्या लाटेची भीती अजूनही पूर्णतः मिटलेली नाही. दिवाळीच्या आसपास सारे काही पूर्वीप्रमाणे सुरू करण्याच्या दृष्टीने पावले मात्र आतापासूनच टाकावी लागतील हे खरे. राज्यातील महाविद्यालये सुरू करण्याच्या दृष्टीने नवीन नियमावली सरकारने जाहीर केली आहे. त्यात नेहमीसारखा गोंधळ दिसतो. उदाहरणार्थ नवीन नियमावलीनुसार कॉलेज कँटीन आणि कॅम्पसमधील दुकाने पुढील सूचना मिळेपर्यंत बंदच राहणार आहेत. त्याचप्रमाणे शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये किमान सहा ते आठ फुटांचे अंतर असायलाच हवे अशीही अट घालण्यात आलेली आहे. हे सगळे विद्यार्थी आणि विद्यार्थिनी कॉलेजमध्ये येताना बस किंवा लोकल गाडीने येणार आहेत याचा नियमावलीकारांना विसर पडलेला दिसतो. लोकल गाड्या आणि बस यांच्यामधील गर्दी दरदिवशी वाढू लागली आहे याचे भान साऱ्यांनीच ठेवलेले बरे. येणारा काळ सावधपणे काढायचा असला तरी आनंदाची ही तिसरी लाट पुन्हा पुन्हा येवो एवढीच इच्छा आहे.**

# चला सहभागी होऊया कोविड-१९ लसीकरण विशेष मोहिमेत

केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार रायगड जिल्ह्यातील नागरिकांचे लसीकरण करण्यात येत आहे. जानेवारी २०२१मध्ये कोविड लसीकरण मोहीम सुरू झाली तेव्हा IEC उपक्रमांचे निरीक्षण आणि देखरेख ठेवण्यासाठी जिल्हा टास्क फोर्स आणि कॉर्पोरेशन टास्क फोर्स तयार करण्यासाठी सविस्तर मार्गदर्शक तत्त्वे प्रसारित केली गेली आहेत. सद्यस्थितीत कोविड लसीकरण मोहिमेमध्ये दररोज सरासरी आठ लाख डोस देत आहेत, परंतु डोसच्या अधिक उपलब्धतेसह ही संख्या लक्षणीय वाढू शकते. काही जिल्ह्यामध्ये संक्रमणाची संख्या लक्षणीयरीत्या कमी झाली आहे.

त्यानुषंगाने सार्वजनिक आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. प्रदीप व्यास यांच्याकडून कोविड–१९ लसीकरण मोहीम जनजागृती व जनसहभाग नियोजन, तसेच कोविड लसीकरण ड्राइव्हबाबत मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्या आहेत. काय आहेत या सूचना जाणून घेऊ पुढील लेखाद्वारे–

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार संपूर्ण राज्यात दि. १६ जानेवारी २०२१ पासून कोविड–१९ लसीकरण मोहीम राबविली जात आहे. दि. ३१ ऑगस्ट २०२१ पर्यंत संपूर्ण राज्यात एकूण पाच कोटी ९० लाख कोविड लसीचे डोसेस दिले गेले आहे. सद्यस्थितीत केंद्र शासनाकडून कोविड लसींचा पुरवठा वाढलेला आहे. सप्टेंबर २१ मध्ये जवळ जवळ दोन कोटी लसी राज्याला उपलब्ध करून दिल्या जातील. याकरिता कोविड लसीकरण सत्रांची संख्या आणि त्याचप्रमाणे लाभार्थ्यांचे लसीकरण वाढविणे गरजेचे आहे. कोविड लसीकरण वाढविण्याकरिता प्रत्येक जिल्ह्यात व महानगरपालिकेत व्यापक प्रमाणात जनजागृती करणे व जनसहभाग मिळविणे गरजेचे आहे. याकरिता पुढीलप्रमाणे नियोजन करण्यात येत आहे.

**DIF/CTE/BTE यांच्या बैठका आयोजित करणे–**

जिल्हा, महानगरपालिका, नगरपालिका, तसेच प्रत्येक तालुक्याच्या स्तरावर या बैठका आयोजित करण्यात येत आहेत. या बैठकीसाठी आरोग्य विभागाबरोबरच इतर सर्व विभागांचे अधिकारी, स्वयंसेवी संस्था, जागतिक आरोग्य संघटना, युनिसेफचे प्रतिनिधी यांचा सहभाग असावा. यामध्ये प्रामुख्याने पुढील बाबींचा आढावा घेऊन नियोजन करावे, असे सूचित




करण्यात आले आहे.

**एकूण १८ वर्षावरील लाभार्थी**

त्यापैकी लसीकरणाचा १ डोस/२ डोस पूर्ण झालेले लाभार्थी

दुसऱ्या डोससाठीचे लाभार्थी

एकही डोस न घेतलेले लाभार्थी

कमी काम असलेले तालुके, गावे, वॉर्डस्

त्यानुषंगाने आयोजित करावयाची लसीकरण सत्रे, विशेष गटासाठी आयोजन (दिव्यांग, विशेष गंभीर आजारी, गरोदर माता इ.)

याबरोबरच शासनाच्या विविध विभागाच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी सुद्धा आवश्यकतेनुसार लसीकरण सत्रांचे नियोजन करावे. (उदा. शिक्षण, गृह, महसूल इ.)

मनपा क्षेत्रामध्ये मोठ्या हौसिंग सोसायटीसाठी, औद्योगिक क्षेत्रासाठी सुद्धा स्वतंत्र लसीकरण सत्र घेता येतील.

**लोकप्रतिनिधींचा सहभाग–**

राज्यामध्ये सर्वच जिल्हे व मनपा कार्यक्षेत्रामध्ये लसीकरणाचे काम वाढविण्याच्या दृष्टीने लोकप्रतिनिधींचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे.

जिल्ह्याचे पालकमंत्री यांना संपूर्ण जिल्ह्याचा आढावा नियमितपणे घेण्यास विनंती करावी.

१८ वर्षावरील एकूण लाभार्थी त्यापैकी अद्याप लसीकरण न झालेले, तसेच जिल्ह्यातील कोणत्या भागामध्ये कमी काम आहे, याबद्दलची माहिती पालकमंत्री महोदयांना द्यावी.

जिल्हा परिषद तसेच महानगरपालिका सर्वसाधारण सभेमध्ये या विषयाबाबत सविस्तर चर्चा करावी.

**स्वयंसेवी संस्था व खाजगी क्षेत्राचा सहभाग–**

जिल्ह्यामध्ये आरोग्याच्या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, स्वयंसहाय्यता गट यांची मदत घ्यावी.

विविध गणेशोत्सव, नवरात्र मंडळ, मित्र मंडळ यांची बैठक बोलवावी, लसीकरणासाठी त्यांचेही सहाय्य घ्यावे.

सर्वच लाभार्थींचे लसीकरण पूर्ण होण्यासाठी विविध धर्माच्या धर्मगुरूंची मदत घेणे आवश्यक आहे. त्यांच्याही स्वतंत्र बैठका आयोजित कराव्यात व लाभार्थींच्या Social Mobilisation साठी त्यांची मदत घ्यावी.

त्याव्यतिरिक्त नेहरू युवा केंद्र, एनसीसी यांनाही सहभागी करून घ्यावे.

इतर विभागांचा सहभाग– कोविड लसीकरण सर्व लाभार्थ्यांना देऊन त्यांना संरक्षित करणे आवश्यक आहे. यासाठी कालबद्ध कार्यक्रम आयोजित करणे, तसेच इतर विभागांनी सहभागी होणे आवश्यक आहे. यामध्ये प्रामुख्याने महिला व बाल विकास विभाग, शिक्षण विभाग, ग्रामविकास विभाग, अल्पसंख्याक विभाग, सामाजिक न्याय गृह विभाग इ. विभागांचा समावेश आहे. या विभागांनी सत्र आयोजनाच्या ठिकाणी Social Mobilisation, Data entry, जनजागृती इ. कामांसाठी मदत करावी.

**लसीकरण सत्राचे नियोजन–**

प्रत्येक कार्यक्षेत्रासाठी लसीकरण सत्राच्या संख्येचा निकष ठरवून देण्यात येत आहे. साधारणपणे या संख्येनुसार सत्र आयोजित करावीत. तथापि यापेक्षा जास्त किंवा कमी सत्रांबाबत स्थानिक स्तरावर निर्णय घेण्यात यावा.

दिलेल्या निकषापेक्षा कमी सत्रांचे आयोजन करावयाचे असल्यास एका सत्रामध्ये जास्त लाभार्थींचे लसीकरण करावे.

प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये साधारणपणे २० गावे असतात. त्यानुसार प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्राने दररोज किमान तीन गावांमध्ये सत्र आयोजित करावीत.

नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रामध्ये ज्या ठिकाणी शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित आहेत, त्या ठिकाणी दररोज ३ व शहरी सामाजिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रामध्ये साधारणपणे दररोज ५ सत्र आयोजित करावीत.

अशा प्रकारे संख्या निश्चित केल्यामुळे कर्मचाऱ्यांवर जास्त कामाचा ताण येणार नाही.

सत्राची तारीख किमान ३ दिवस आधी निश्चित करावी.

ज्या गावामध्ये लसीकरण सत्र आयोजित केले असेल त्या गावामध्ये सत्राच्या २ दिवस आधी मोठ्या प्रमाणावर जनजागृती करावी.

प्रत्येक गावामध्ये लसीकरणाच्या दिवशी लाभार्थींना बोलविण्यासाठी गावातील स्वंयसेवक, आशा, अंगणवाडी कार्यकर्ती, VHNSCचे सदस्य यांना जबाबदारी दयावी.

प्रत्येक गावासाठी एक कोविड लसीकरण संनियंत्रण समिती स्थापना करावी. यामध्ये सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील, गावातील प्रतिष्ठित नागरिक यांचा समावेश असावा. अशीच समिती वॉर्ड स्तरावर तयार करण्यात यावी.

या समितीने सत्राची पूर्वतयारी, सत्राचे नियोजन व सत्राच्या दिवशी संनियंत्रण करावे व जास्तीत जास्त लाभार्थींचे लसीकरण पूर्ण होईल याकडे लक्ष द्यावे.

आदिवासी क्षेत्रासाठी वेगळी कार्यप्रणाली अवलंबावी. या भागामधील आश्रमशाळा, आदिवासी वसतिगृह अशी ठिकाणे लसीकरणासाठी निश्चित करावीत.

आदिवासी पाडे विखुरलेले असल्यामुळे २/३ पाड्यांसाठी सत्र आयोजित करावीत.

**जनजागृती–**

गावस्तरावर लसीकरण सत्रापूर्वी दवंडी देण्यात यावी. किमान दोन दिवस आधी गृहभेटीद्वारे लाभार्थींना अवगत करावे.

लाभार्थींनी नोंदणी कशी करावी तसेच On the spot रजिस्ट्रेशनची सुविधा याबद्दलही माहिती देण्यात यावी.

मा. लोकप्रतिनिधींनी त्यांची ऑडिओ व व्हिडिओ क्लीप तयार करून ती फेसबुक, व्हॉटसअप, ट्विटर, इंस्टाग्राम, युट्यूब व इतर माध्यमांद्वारे सर्वांपर्यंत पोहोचवावी.

याबरोबरच वॉल पेंटिंग्ज, विद्यार्थ्यांचे गट करून त्यांना ठराविक घराची जबाबदारी देणे, महिला मंडळ, बचत गट यांचीही मदत घ्यावी.

दूरदर्शन, स्थानिक केबलचा वापर करावा.

ज्याप्रमाणे मतदार नोंदणी करण्यासाठी नियोजन केले जाते. त्याच पद्धतीने लाभार्थींच्या रजिस्ट्रेशनसाठी स्थानिक पातळीवर लोकप्रतिनिधींनी शिबिरे आयोजित करावीत व यासाठी पूर्वप्रसिद्धी द्यावी.

अशा प्रकारे नियोजन केल्यास मोठ्या संख्येमध्ये लसीकरण करणे शक्य होईल, त्यामुळे लसीकरण जास्तीत जास्त होण्यासाठी सर्व यंत्रणांनी एकमेकांच्या सहकार्याने कसोशीने प्रयत्न करावेत, तसेच नागरिकांनीही या लसीकरण मोहिमेस उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# माणगाव बसस्थानकाची दुरवस्था; लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष

■ प्रवासी संतप्त, भाजपचा आंदोलनाचा इशारा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव बसस्थानकात प्रचंड खड्डे पडले असून, या समस्येकडे गेल्या अनेक वर्षापासून राज्य परिवहन (एसटी) महामंडळ दुर्लक्ष करीत आहे. पालकमंत्री व स्थानिक आमदार आदिती तटकरे बसस्थानकाच्या दुरवस्थेकडे लक्ष देतील काय, असा सवाल प्रवासी व नागरिक उपस्थित करीत आहेत. दरम्यान, या बस्थानकातील रस्त्याचे काम ३१ ऑक्टोबरपर्यंत मार्गी न लागल्यास १ नोव्हेंबरला रास्ता रोको करण्याचा इशारा भाजपचे तालुका अध्यक्ष संजयआप्पा ढवळे यांनी दिला आहे.

माणगाव हे मुंबई–गोवा महामार्गावरील महत्त्वाचे तालुक्याचे ठिकाण आहे. येथील एसटी बस स्थानकामध्ये रोज ३५० पेक्षा जास्त गाड्यांची ये–जा सुरू असते, मात्र या बसस्थानकाची दुरवस्था झाली आहे. प्रवाशी शेडवरील स्लॅब पाडण्यात आला आहे. तेथे टाकलेले पत्रे चक्रीवादळात उडून गेले आहेत. त्याठिकाणी तात्पुरते पत्रे टाकण्यात आले आहेत. सालाबादप्रमाणे यंदाही या बस स्थानकात सगळीकडे खड्ड्यांचेच साम्राज्य झाले आहे. त्यामुळे येथून चालत जाणे आणि गाड्या चालविणे अवघड झाले आहे. दरवर्षीप्रमाणे या बसस्थानकाच्या प्रवेशद्वारावरच मोठा खड्डा पडला असून, त्यात कायम पाणी साठलेले असते. हे खड्डे भरण्यास



ठेकेदार टाळाटाळ करीत असल्याचे समजते. एसटी महामंडळाने तीन वर्षापूर्वी येथील खड्ड्यांवर तात्पुरती मलमपट्टी केली होती, पण कायमचा हा प्रश्न सोडविण्यासाठी हे महामंडळ प्रयत्न करीत नाही. तर स्थानिक आमदार असलेल्या पालकमंत्री आदिती तटकरे यांचेही माणगाव एसटी स्थानकाकडे दुर्लक्ष झाले आहे.

दरम्यान, माणगाव एसटी स्थानकाच्या दुरवस्थेबाबत भाजप आक्रमक झाला आहे. बस्थानकातील रस्त्याचे काम ३१ ऑक्टोबरपर्यंत मार्गी लावावे, अन्यथा १ नोव्हेंबरला बसस्थानकासमोरच रास्ता रोको करण्याचा इशारा भाजपचे तालुका अध्यक्ष संजयआप्पा ढवळे यांनी आगार व्यवस्थापकांना निवेदनाद्वारे दिला आहे. ढवळे यांनी या निवेदनाच्या प्रती विधानसभा व विधान परिषद विरोधी पक्षनेते, माणगाव विभागीय पोलीस अधिकारी आणि पोलीस निरीक्षक यांना दिल्या आहेत.



(छाया : महादेव सरसंबे)



# रोह्यात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

## जुन्या आठवणींना मिळाला उजाळा

**रोहे : प्रतिनिधी**

येथील डॉ. चिंतामणराव देशमुख वाणिज्य व कला महाविद्यालयातील ९६च्या बॅचच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा १६ ते १७ ऑक्टोबरदरम्यान खांब येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात वाणिज्य व कला शाखेच्या माजी विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला.

व्हॉट्सॲप ग्रुपद्वारे एकत्रित आलेल्या डॉ. चिंतामणराव देशमुख महाविद्यालयातील ९६च्या बॅचच्या विद्यार्थ्यांनी या मेळाव्यात आठवणीचा कट्टा या कार्यक्रमात आपल्या शालेय आठवणी सांगितल्या. एकमेकांबद्दलची सध्यस्थिती जाणून घेतली. सचिन शिंदे, सतिष महाडिक, रूपेश पाटील, महेंद्र दिवेकर, कृष्णा मोरे, सविता देशपांडे, टी. टी. सुरज या माजी विद्यार्थ्यांनी या स्नेहमेळाव्याचे आयोजन केले होते.

या मेळाव्यात ४० माजी विद्यार्थी व विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या.

# कोजागिरी पूर्वीची आणि आताची..!

कोजागिरी पौर्णिमा म्हणजे पावसाळा संपल्यानंतरचे निरभ्र व स्वच्छ आकाशातील चांदण्याच्या लुकलुकण्याचे दिवस. हवेतील पावसाची आर्द्रता कमी होऊन हळूवार थंडीला जेव्हा सुरुवात होते तेव्हा मनालाही गारवा मिळतो. अशा वेळी दव पडायला सुरुवात होते. झाडाच्या पानांवर काही ठिकाणी पानथळ भागात हिरव्या गवतावर दवाचे थेंब सकाळच्या सोनेरी कोवळ्या उन्हात मोत्यासारखे, तर झाडाच्या पानांवर पाचूसारखे चमकतात. सर्वच माणसे हे दृश्य मन लावून पाहत नाहीत, परंतु रसिक माणसे हे निसर्गसौंदर्य आवर्जून पाहत असतात. त्या वेळी अश्विन महिन्यात पौर्णिमेला कोजागिरी असते. म्हणून तिला कोजागिरी पौर्णिमा म्हणतात.

गौरी गणपतीचा गणेशोत्सव, दुर्गादेवीचा नवरात्रोत्सव संपलेला असतो. शेतीमध्ये सोन्यासारखी पिवळी झालेली पिके डोलत असतात. काही कापणीलायक हळवी पिके शेतकरी कापून साठवण करून ठेवतात. कोजागिरीनंतर दिवाळी सणाची चाहूल लागलेली असते. आसमंतात आनंदाचे वातावरण पसरलेले असते. गणेशोत्सव आणि नवरात्रोत्सवात नाचून गाऊन थकलेली मुले, माणसे कोजागिरीची वाट पाहत असतात. कारण कोजागिरी पौर्णिमा म्हणजे एक दिवस मौजमजा करण्याचा दिवस, परंतु आता कोजागिरीची वेगळीच अवस्था झाली आहे.

पूर्वीचे कोजागिरीचे दिवस आठवले की त्या वेळच्या आठवणी, भावभावना, सर्वधर्मसमभाव, प्रेम, उत्साह एक सण म्हणून सर्व डोळ्यासमोर उभे राहते. आमच्या लहानपणी शालेय जीवनातील कोजागिरीचे दिवस आठवले की जुन्या स्मृतीला उजाळा येतो. ५०–६० वर्षापूर्वी आम्ही मित्रमंडळी दरवर्षी कोजागिरी साजरी करायचो. ग्रामीण भागात राहत असल्यामुळे सोयीसुविधांची कमतरता होती. आतासारखी गडगंज संपत्ती व श्रीमंती नव्हती. गरिबी होती, परंतु माणूसकी आणि एकमेकांबद्दल स्नेहभाव होता. आदर होता. त्या वेळी ग्रामीण भागात कोजागिरी असली की आम्ही मुले प्रत्येकी चारआणे प्रमाणे वर्गणी गोळा करायचो. अत्यंत गरीब असलेल्या मित्रांकडून आम्ही वर्गणी घेत नव्हतो, परंतु त्याला आदरपूर्वक कोजागिरी कार्यक्रमात सहभागी करायचो. मौजमजा करायचो. खूप मजा यायची कोजागिरीला.

आता गेले ते दिन गेले. आताची कोजागिरी म्हणून पार्टी. पूर्वी आम्ही जमविलेल्या वर्गणीतून भरपूर दूध आणायचो. त्या वेळी ग्रामीण भागात गाई–म्हैशी खूप असल्यामुळे कमी दरात भरपूर दूध मिळायचे. ग्रामीण भागात त्याकाळी बदाम, पिस्ता, काजूगर नसले, तरी वेलची मात्र आणायचो कोणाकडून तरी. केशर आणून केसरी दूध बनवायचो. तीन दगड आणून चूल बनवायचो. गावाबाहेरच्या माळावर त्या चुल्यावर कल्हई लावलेले पितळी पातेले ठेवून त्यात दूध–साखर टाकून संपूर्ण दुधावर चांदणं पडेल अशा जागेत झाडाच्या सुक्या फाट्यांचा जाळ करून दूध आटवायचो. दूध आटविण्यासाठी ठराविक मित्र त्या चुल्याजवळ दूध उतू नये म्हणून ढवळत बसायचे आणि आम्ही मित्र गप्पागोष्टी, गाण्यांच्या भेंड्या किंवा चांदण्यात हुतुतू, लंगडीचा खेळ खेळायचो. बरोबर रात्रीचे १२ वाजले की दुधात दिसणारा आकाशीचा चंद्र पाहायचो आणि पूर्वीच्या काळी पितळी ग्लास असायचे. ते सर्वांना सारखे भरून देऊन चांगण्यात आटवलेले स्वादिष्ट दूध प्यायचो. त्याची चव वर्षभर जिभेवर राहायची. दूध नेहमीच पीत असतो, परंतु कोजागिरीच्या चांदण्यात आटविलेले दूध शरीराला पोषक असते. आरोग्याच्या दृष्टीने ते एक औषध असते, असा समज मनामध्ये भावना करून बसला होता. त्यामुळे वर्षातून एकदा चांगण्यात आटविलेले दूध प्यावे असे जुनी, जाणकार, वडीलधारी मंडळी सांगायची आणि त्यांचे विचार आमच्या बालमनावर ठसा करून बसायचे. आम्ही साजरी केलेली कोजागिरी आजही मनातील आठवणी जाग्या करून देतात, मात्र आताची कोजागिरी नवतरुणांची कोजागिरी म्हणून मानली जाते. गावोगावी बॅन्डच्या तालावर डिस्को डान्स, दुधाऐवजी दारूची बाटली हातात घेऊन साजरी करतात. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांच्या मनात विषण्णता निर्माण होते. ते म्हणतात, पूर्वीचे व्रत वैकल्यांची धार्मिकता आता पार निघून गेली. पाश्चात्य संस्कृतीचा जमाना आला आहे.

वर्षातील १२ पौर्णिमांपैकी कोजागिरीला मोठे महत्त्व असते, परंतु आता किती लोक चांदण्यात दूध आटवून कोजागिरी साजरी करतात? याउलट आता तर अनेक जण कोजागिरी व्हेज–नॉनव्हेज व दारूच्या पार्ट्यांनी साजरी करतात. यापुढे कोजागिरी म्हणजे पार्टीचा दिवस म्हणून साजरा केला जाईल. जुन्या संस्कृतीला मूठमाती दिली जाईल व नव्या प्रथेला उजाळा येईल. कोजागिरीचे पूर्वीचे मजेचे दिवस निघून जातील आणि फक्त आठवणी राहतील, अशी भीती वाटते.

**–धनंजय गोंधळी, चिरनेर, उरण**

# महावितरणच्या रोहित्रांवर कर आकारणी करा

## ■ राजिप मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे गटविकास अधिकाऱ्यांना आदेश

**अलिबाग : प्रतिनिधी**

महावितरणच्या टॉवर, पोल आणि रोहित्रांवर ग्रामपंचायतीकडून कर आकारणी करा, असे लेखी आदेश रायगड जिल्हा परिषदेचे (राजिप) मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी जिल्ह्यातील सर्व गटविकास अधिकाऱ्यांना दिले आहेत. राजिपच्या या कर आकारणीवरून राजिप आणि महावितरण यांच्यात वाद होण्याची शक्यता आहे.

ग्रामिण भागातील पथदिव्यांची वीज देयके थकल्याने महावितरणने वीजपुरवठा खंडित केला होता. त्यामुळे ग्रामिण भागातील लोकांना बराच काळ अंधारात रहावे लागले होते. सुरूवातीला जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाकडून पथदिव्यांची देयके दिली जात होती. आता मात्र ही देयके संबंधीत ग्रामपंचायतींना भरण्याचे आदेश देण्यात आले आहेत. देयकांची रक्कम मोठी असल्याने ती भरण्यात अडचणी येत होत्या.

यावेळी महावितरणने ताठर भुमिका घेत सक्तीने वीज देयक वसूली सुरु ठेवली होती. त्यामुळे आता ग्रामपंचायतींकडून महावितरणची कोंडी करण्याचे प्रयत्न सुरु झाले आहेत. त्यामुळे राजिप आणि महावितरण यांच्यात वाद होण्याची चिन्हे आहेत.

उच्च न्यायालयाने कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यातील माणगाव ग्रामपंचायतीच्या दाव्यावर निकाला देताना असे कर आकारणीबाबत आदेश दिला आहे. तसेच राजिपच्या स्थायी समितीच्या बैठकीत महावितरणच्या सर्व लघु, उच्चदाब वाहिन्यांचे खांब, रोहीत्र यांच्यावर ग्रामपंचायत अधिनियमा आंतर्गत कर आकारणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार हे आदेश काढण्यात आल्याचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी गटविकास अधिकाऱ्यांना काढलेल्या आदेशात म्हटले आहे.

शासन निर्णयानुसार महावितरण आणि महापरेषणच्या विद्युत वाहिन्यांच्या खांबावर तसेच रोहित्रांवर ग्रामपंचायती, नगरपालिका आणि महानगरपालिका यांनी कर आकारणी करू नये, असे आदेश राज्य सरकारच्या उद्योग व ऊर्जा विभागाने दिले आहेत. या निर्णयानुसार ग्रामपंचायती आणि नगरपालिकांना महावितरणकडून कर आकारणी करता येणार नाही, असे महावितरणकडून सांगण्यात आले.



# श्रीवर्धनमधील 'जिओ'चा टॉवर सुरू होणार?

(छाया : भारत चोगले)



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

शहरातील राऊत विद्यालयासमोर एका खाजगी जागेमध्ये जिओ मोबाइल कंपनीने टॉवर उभारला असून, तो कार्यान्वीत करण्याच्या हालचालींना वेग आला आहे. दरम्यान, श्रीवर्धनमधील नागरिकांचा या मोबाइल टॉवरला प्रचंड विरोध आहे.

श्रीवर्धनमधील र. ना. राऊत विद्यालयाच्या बाजूला एका खाजगी वाडीत जिओ मोबाइल कंपनीने टॉवर उभारला आहे. त्याला थानिक नागरिकांनी विरोध केला होता. या ठिकाणी मोबाइल टॉवर चालू करू नये, असे पत्र र. ना. राऊत विद्यालयाने नगर परिषदेला दिले होते. टॉवरच्या रेडिएशनमुळे विद्यार्थ्यांना गंभीर आजार उद्भवू शकतात, त्यामुळे या मोबाइल टॉवरला परवानगी देवू नये, अशी मागणी शिवसेनेचे शहर प्रमुख राजेश चव्हाण यांनी केली होती. मात्र नगर परिषद प्रशासनाने कोणालाही विश्वासात न घेता टॉवर उभारणीस नाहरकत दाखला दिला. त्यामुळे पावसाळा सुरू होण्याअगोदरच टॉवर उभारण्याचे काम पूर्ण करण्यात आले.

हा टॉवर कार्यान्वित करण्यासाठी लागणारी यंत्रणा चार दिवसांपुर्वी बसविण्यात आली आहे. ही मशिनरी टॉवरजवळ नेण्यासाठी गटारांमध्ये मातीचा भराव करून रस्ता तयार करण्यात आला आहे. पावसाळ्या अगोदरही असाच रस्ता तयार करण्यात आला होता. त्यामुळे गटार बंद होऊन पावसाळ्यात भैरवनाथ मंदिर परिसरात गुडघ्यापेक्षा जास्त पाणी तुंबल होते.

या भागातील पावसाचे पाणी वाहून नेणाऱ्या नैसर्गिक नाल्याला एका जमीनदाराने वळण दिल्यामुळे पाण्याचा निचरा योग्य प्रकारे होत नाही. त्यामुळे या भागात अनेक शेतकऱ्यांनी पेरलेले भात उगवलेच नाही. ज्यांचे भात उगवले होते, ते शेतातील पाण्यामुळे कुजून गेले. या बाबत वारंवार तक्रारी करूनही नगर परिषदेने सदर जमीनदारावर कोणत्याही प्रकारची कारवाई केली नाही.

> **पावसाचे पाणी वाहून नेणारा नैसर्गिक नाला बुजवल्यामुळे शेतात पेरलेले दीड मण भात फुकट गेले. याबाबत नगराध्यक्ष व मुख्याधिकाऱ्यांकडे तक्रार केली होती. तसेच गटारात मोठे ओंडके पडल्यामुळे पावसाचे पाणी माझ्या अंगणात तुंबत आहे. याबाबत तक्रार करूनसुद्धा नगर परिषद प्रशासनाने कोणत्याही प्रकारची कारवाई केलेली नाही.**
>
> **-संतोष केळसकर, माजी उपनगराध्यक्ष, श्रीवर्धन नगर परिषद**

श्रीवर्धन नगर परिषदेने या मोबाइल टॉवरचे काम तातडीने थांबवावे अशी मागणी नागरिकांमधून करण्यात येत आहे.

# पेणमध्ये पोलीस भरती लेखी परीक्षा

**पेण : प्रतिनिधी**

शहरात सोमवारी (दि. १८) पोलीस भरती लेखी परीक्षा घेण्यात आली. त्यासाठी राज्यभरातील परीक्षार्थी पेणमध्ये मोठ्या संख्येने दाखल झाले होते. या परीक्षेसाठी पेण शहरात सात केंद्रावर २१६० परीक्षार्थीची आसन व्यवस्था करण्यात आली होती.

पेण शहरातील सार्वजनिक विद्यामंदिर, केईएस स्कुल, प्रायव्हेट हायस्कुल, ज्युनिअर कॉलेज, भाऊसाहेब नेने कॉलेज, पतंगराव कदम कॉलेज आणि शासकीय तंत्रनिकेतन विद्यालय या केंद्रांवर सोमवारी पोलीस भरती लेखी परीक्षा घेण्यात आली. त्यासाठी रविवारी रात्रीपासून परजिल्ह्यातून आलेल्या परीक्षार्थीची निवास व जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच परीक्षा केंद्रावर चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. पोलीस उपविभागीय अधिकारी विभा चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ यांनी चांगल्या प्रकारे व्यवस्था केली होती.





(छाया : अनिस मनियार)

# परतीच्या पावसाने भाज्यांचे नुकसान

## श्रीवर्धनमध्ये भाव कडाडले, गृहिणींचे बजेट कोलमडले

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

परतीच्या पावसाचे पाणी तुंबून शेतामध्ये असलेल्या भाज्या कुजल्या आहेत. परिणामी बाजारात भाज्यांची आवक कमी झाली आहे. त्यामुळे भाज्या महागल्या आहेत.

श्रीवर्धनमध्ये नेहमी २५ ते ३० रुपये किलो दराने मिळणारे टोमॅटो सध्या ६० ते ८० रुपये किलो दराने विकले जात आहेत. गवार १२० रुपये किलो विकली जात आहे. कोथिंबीर जुडी ८० रुपयांवर जाऊन पोचली आहे. सिमला मिरची, फ्लॉवर, फरसबी यांचे भावदेखील मोठ्या प्रमाणावर वाढले आहेत. वांगी, कोबी, हिरवी मिरची, आले, लिंबू यांच्या किमतीमध्येही वाढ झाली आहे. लसूण दोनशे रुपये किलोने विकली जात असून कांदा ६० रुपये किलो झाला आहे. तर बटाटे ३० रुपये किलो झाले आहेत.

बाहेरील बाजारातून श्रीवर्धनमध्ये भाज्यांची आवक कमी झाली आहे तर तालुक्यात पिकणाऱ्या भाज्या बाजारात येत नाहीत. त्यामुळे भाज्यांचे भाव कडाडले आहते. भाव वाढल्यामुळे भाजी विक्रीमध्येही मंदी आल्याचे विक्रेत्यांचे म्हणणे आहे.



(संग्रहित छायाचित्र)

# मुरूडमध्ये मार्गदर्शन शिबिर

**मुरूड : प्रतिनिधी**

रिलायन्स फाउंडेशन, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आणि नेहरू युवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आपत्तीचा धोका टाळण्यासाठी मुरूडमध्ये मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. आपत्तीचा धोका टाळण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन योजनेची आखणी करणे आवश्यक आहे, असे मत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक यांनी या वेळी व्यक्त केले.

न्या. संदीप स्वामी यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडून देण्यात येणाऱ्या सेवा संदर्भात माहिती दिली. तर आपत्तीच्या वेळी होणाऱ्या नुकसानीपासून कशा प्रकारे बचाव करता येईल, यासंदर्भात सागर पाठक यांनी या वेळी मार्गदर्शन केले. रिलायन्स फाउंडेशनचे तेजस डोंगरीकर यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. नेहरू युवा केंद्राचे अधिकारी निशात रौतले, सुशील साईकर यांच्यासह अधिकारी व नागरिक या वेळी उपस्थित होते.

# म्हसळ्यात वाचन प्रेरणा दिन साजरा

**म्हसळा :** माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम याच्या जयंती निमित्त म्हसळा तालुका सार्वजनिक वाचनालयामध्ये वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. या वेळी डॉ. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. वाचनालयाचे अध्यक्ष संजय खांबेटे, सचिव अशोक काते, माजी सभापती महादेव पाटील, प्रा. महमद शेख, आर. एस. माशाळे, ग्रंथपाल उदय करडे, दिपाली दातार, सायली चोगले आदी उपस्थित होते. डॉ. कलाम यांच्या विषयीच्या पुस्तक प्रदर्शन या वेळी भरविले होते.

# कर्जत वंजारपाडा येथील भरत मेहरा यांना दुबई सरकारकडून गोल्डन व्हिसा

**कर्जत : बातमीदार**



तालुक्यातील वंजारपाडा येथील राधा मीरा चॅरिटेबल ट्रस्ट या सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष भरत मेहरा यांना दुबई (यूएई) सरकार आणि विमानतळ ऑथॉरिटी यांच्याकडून गोल्डन व्हिसा देण्यात आला आहे.

यूएई सरकारकडून फक्त नामवंत उद्योजक, क्रीडापटू आणि अभिनेते यांना गोल्डन व्हिसा देऊन सन्मानित करण्यात येते. भारतातील आघाडीचे उद्योजक अजय पिरामल समूह समर्थित राधा मीरा ट्रस्टचे भरत मेहरा अध्यक्ष असून, त्यांनी ट्रस्टच्या माध्यमातून एक सामुदायिक स्वयंपाकघर उभारले असून, तेथे दीनदुबळ्यांना पौष्टिक जेवण पुरवले जाते. तसेच तालुक्यातील अनेक आदिवासीवाड्यांना पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

मागास समाजासाठी ट्रस्ट तर्फे मोफत औषधे, शैक्षणिक मदत, रुग्णवाहिका सेवा पुरविली जाते तसेच मोफत नेत्र शस्त्रक्रियेसह विविध वैद्यकीय शिबिरे घेण्यात येतात. कोविड काळात फूड पॅकेट्स आणि कोविड प्रोटेक्शन किट वितरणाव्यतिरिक्त ट्रस्टने स्थानिक समुदायांमध्ये कोरोनाविषयक जागरूकता निर्माण करण्यात आली. मेहरा यांचा मध्य आशियात उद्योग व्यवसाय असून, त्यांना युएई सरकार आणि विमानतळ ऑथॉरिटी यांनी १० वर्षांचा गोल्डन व्हिसा देऊन सन्मानित केले आहे.

# रायगड जिल्ह्यात पहिल्या टप्प्यामध्ये २४ भात खरेदी केंद्र सुरू होणार

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात भातकापणीच्या कामाला सुरुवात झाली आहे. आठवडाभरात जिल्ह्यात टप्प्याटप्प्याने २४ भात खरेदी केंद्र सुरू करण्यात येणार आहेत. या केंद्रांवर सर्वसाधारण प्रतीचा भात एक हजार ९४० रुपये प्रति क्विंटल दराने विक्री करता येणार आहे तसेच या वर्षीही राज्य शासनाकडून अतिरिक्त दिल्या जाणाऱ्या बोनसची रक्कम शेतकऱ्यांना दिली जाणार आहे.

जिल्ह्यात भात खरेदी केंद्र सुरू करा, अशी मागणी शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली होती. त्यानुसार पुढील आठवड्यापासून भात खरेदी सुरू करण्यात येणार असल्याची माहिती मार्केटिंग फेडरेशनकडून देण्यात आली. शेतकऱ्यांना भाताची विक्री शासकीय खरेदी केंद्रावर करायची असून त्यासाठी केंद्रावर आगाऊ ऑनलाईन नोंदणी सुरू करण्यात आली आहे.

किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत शासनाने या वर्षासाठी सर्वसाधारण दर्जाच्या भाताला प्रती क्विंटल एक हजार ९४० रुपये हमीभाव जाहीर केला आहे. गतवर्षी भातासाठी एक हजार ८६८ रुपये हमीभाव व ७०० रुपये बोनस असा एकूण दोन हजार ५६८ रुपये दर शेतकऱ्यांना देण्यात आला. यात 'अ' दर्जाच्या भाताच्या किमतीत साधारण २० रुपयांचा फरक असणार आहे.

रायगड जिल्ह्यात दोन लाख ३० हजार मेट्रिक टन इतकी विक्रमी भाताची खरेदी २००८मध्ये झाली होती. हा विक्रम मागल वर्षी मोडीत निघाला असून एका वर्षात तब्बल ४.१० मेट्रिक टन भात खरेदी महाराष्ट्र राज्य मार्केटिंग फेडरेशनच्या माध्यमातून झाली आहे.



(संग्रहित छायाचित्र)

> **भातखरेदी केंद्र सुरू करण्याचे आदेश शासनाकडून प्राप्त झाले आहेत. जिल्ह्यात पहिल्या टप्प्यात २४ भात खरेदी केंद्र सुरु करण्यात येणार आहेत. शेतकऱ्यांना वाहतूक करणे सोयीचे होईल अशाच मध्यवर्ती ठिकाणी ही सर्व केंद्र आहेत.**
>
> **-के. टी. ताटे, जिल्हा मार्केटिंग अधिकारी**

(छाया : सलीम शेख)



# माणगावमध्ये 'अंनिस'ची स्थापना

**माणगाव : प्रतिनिधी**

येथील टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेजमध्ये अंधश्रद्धा निर्मूलन समिती (अंनिस) च्या माणगाव शाखेची स्थापना करण्यात आली.

टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेजचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि महाराष्ट्र अनिसच्या रायगड जिल्हा शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने कॉलेजमध्ये नुकताची एक प्रथम संपर्क बैठक घेण्यात आली. अनिसचे जिल्हा पदाधिकारी भाऊसाहेब सावंत, निलेश घरत व मोहन भोईटे तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा. हर्षल जोशी यांच्यासह २५ विद्यार्थी या बैठकीला उपस्थित होते. बैठकीत अंधश्रद्धेविषयी जनजागृती यावर चर्चा झाली. भाऊसाहेब सावंत यांनी श्रद्धा व अंधश्रद्धा यातील फरक सांगून अंधश्रद्धेची अनेक उदाहरणे दिली. मोहन भोईटे यांनी विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली.

या बैठकीत अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या माणगाव शाखेची स्थापना करण्यात आली.

अंनिसच्या माणगाव शाखेत एकूण आठ विद्यार्थी घेण्यात आले असून त्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यानंतर हे विद्यार्थी आपापल्या गावात अंधश्रद्धेविषयी जनजागृती करणार आहेत. अमित बाकडे, दिलीप ढेपे, संजय गायकवाड यांनी ही बैठक यशस्वी करण्यासाठी विशेष सहकार्य केले.

# पहिल्याच दिवशी उलटफेर

## टी-२० वर्ल्डकपमध्ये स्कॉटलंडची बांगलादेशवर मात

**अल अमिरात : वृत्तसंस्था**

टी-२० वर्ल्डकप स्पर्धेच्या सलामीच्या सामन्यात उलटफेर पाहावयास मिळाला. स्कॉटलंडने जबरदस्त कौशल्य दाखवत बांगलादेशवर सहा धावांनी विजय मिळविला. या सामन्यात बांगलादेशचा कर्णधार महमूदुल्लाह याने नाणेफेक जिंकून स्कॉटलंडला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले होते. स्कॉटलंडने २० षटकांत ९ गडी बाद १४० धावा केल्या. प्रत्युत्तरात बांगलादेशला २० षटकांत ७ बाद १३४ धावांपर्यंतच पोहचता आले.




स्कॉटलंडने २० षटकांत ९ गडी गमावून १४० धावा केल्या. ख्रिस ग्रीव्हसने २८ चेंडूत ४ चौकार आणि २ षटकारांसह ४५ धावा केल्या. त्याने मार्क वॅट (२२) सोबत सातव्या विकेटसाठी ५१ धावांची भागीदारी केली. बांगलादेशकडून मेहदी हसनने तीन, तर शाकिब अल हसन आणि मुस्तफिजुर रहमानने प्रत्येकी दोन बळी घेतले.

प्रत्युत्तरात बांगलादेशची सुरुवात खराब झाली. लिटन दास आणि सौम्या सरकार हे त्यांचे दोन्ही सलामीवीर वैयक्तिक आणि प्रत्येकी ५ धावांची भर घालून तंबूत परतले. त्यानंतर मुशफिकूर रहिमने (३८) संघाचा डाव सांभाळण्याचा प्रयत्न केला, पण धावगती वाढवण्यात तो अपयशी ठरला. कप्तान महमुदुल्लाह खेळपट्टीवर असेपर्यंत बांगलादेशला विजयाची आशा होती, मात्र १९व्या षटकात व्हीलने त्याला बाद करीत स्कॉटलंडचा विजय निश्चित केला. स्कॉटलंडकडून व्हीलने तीन, तर ग्रीव्हजने दोन बळी घेतले.

### आयर्लंडच्या कॅम्फरची हॅट्ट्रिक

**आबुधाबी** : टी-२० विश्वचषकाच्या पात्रता फेरीतील नेदरलँडविरुद्धच्या



सामन्यात आयर्लंडच्या कर्टिस कॅम्फरने हॅट्ट्रिक घेतली. यासह यंदाच्या विश्वचषकातील पहिली हॅट्ट्रिक घेण्याचा मान कॅम्फरला मिळाला आहे. त्याने चार षटकांत २६ धावा देत चार गडी बाद केले. विशेष म्हणजे एका षटकात हा पराक्रम कॅम्फरने केला आहे.

# ओमानचा पापुआ न्यू गिनीवर विजय





**अल अमिरात : वृत्तसंस्था**

यजमान ओमानने टी-२० विश्वचषक स्पर्धेची सुरुवात विजयासह केली आहे. स्पर्धेच्या सलामीच्या सामन्यात त्यांनी पापुआ न्यू गिनीचा (पीएनजी) १० गडी राखून पराभव केला.

ओमानचा कर्णधार जीशान मकसूदने नाणेफेक जिंकून पीएनजी संघाला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले. पीएनजी संघ २० षटकांत नऊ गडी गमावून १२९ धावाच करू शकला. ओमानने १३.४ षटकांत एकही विकेट न गमावता लक्ष्य गाठले. जतिंदर सिंगने नाबाद ७३, तर दुसरा सलामीवीर आकिब इलियासने नाबाद ५० धावा केल्या.

आकिब आणि जतिंदरने ओमानला चांगली सुरुवात दिली. पॉवरप्लेमध्येच संघाने कोणतीही विकेट न गमावता ४६ धावा जोडल्या. यानंतर या दोघांनी १२व्या षटकातच १००चा आकडा पार केला. जतिंदरने षटकारासह आपले अर्धशतक पूर्ण केले. त्यानंतर आकिबनेही डावाच्या १४व्या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर आपले अर्धशतक पूर्ण केले.

तत्पूर्वी ओमानचा कर्णधार जीशानने अवघ्या २० धावांत चार बळी घेतले. पीएनजीचा कर्णधार असद वाला याने शानदार अर्धशतक झळकावले. ओमानकडून बिलाल खान आणि कलीमुल्लाहनेही प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या.

# आरोग्य प्रहर

## दृष्टी वाढवण्यासाठी ‘ही’ योगासने करा!

डोळे हा मानवाचा महत्त्वपूर्ण अवयव आहे. पंचेद्रियात त्याला स्थान आहे. डोळे असतील तर सर्व काही पाहता येते. त्यामुळे त्यांची निगा राखणे महत्त्वाचे असते. दृष्टी चांगली करण्यासाठी काही योगासनेदेखील उपयुक्त आहे.

**हलासन** – हलासन मनाला शांत करते. यामुळे ताण कमी होतो. हे डोकेदुखी आणि निद्रानाश दूर करते. पचन सुधारण्यास मदत करते. विशेष म्हणजे हे आसन दृष्टी वाढवण्यासाठी मदत करते.

**बाल बकासन** – मार्गारियासनमध्ये सुरुवात करा. आपली कोपर सपाट खाली ठेवा. तुमची बोटे पुढे असावीत. अशा प्रकारे पुढे झुकून घ्या की तुमच्या शरीराचे सर्व वजन ट्रायसेप्सवर जाईल. स्वतःला संतुलित करा आणि हळूहळू आपले दोन्ही पाय जमिनीवरून उचला. आपले पाय एकत्र आणा.

**उष्ट्रासन** – या आसनात उंटासारखी मुद्रा बनवली जाते. हे करण्यासाठी सर्वप्रथम आपल्या गुडघ्यांवर खाली उतरा. आपल्या गुडघ्यांची रुंदी खांद्याच्या बरोबरीने ठेवा आणि तळवे आकाशाच्या दिशेने वाढवा. आता पाठीचा कणा मागे वाकवा आणि दोन्ही हातांनी गुडघ्यांना स्पर्श करण्याचा प्रयत्न करा.

**बालासन** – हे आसन करण्यासाठी गुडघे वाकवून, पायाची बोटं स्पर्श करून आणि टाच बाहेरच्या दिशेने बोटांवर बसा. आपले हात आणि कंबर पुढे वाकवा. हळूवारपणे आपले कपाळ जमिनीवर ठेवा किंवा आपले डोके एका बाजूला वळवा. या आसनामध्ये पाच मिनिटे स्थिर राहा.

**मार्जरीआसन** – हे आसन आपल्या पाठीच्या कण्यासाठी फायदेशीर आहे. यामुळे रक्ताभिसरण चांगले होते. खांदे आणि मानेवरील ताण कमी होतो. हे आसन करण्यासाठी आपले हात आणि गुडघे जमिनीवर ठेवा. श्वास घ्या आणि पाच मिनिटांसाठी आसन स्थितीमध्ये स्थिर राहा.



# गोशीन रियूच्या खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**उरण : प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय किकबॉक्सिंग स्पर्धेत आर्मीचर किक बॉक्सिंग असोशिएशन वाको गोशीन रियू कराटेच्या विद्यार्थ्यांनी विविध गटात भाग घेतला होता. त्यामध्ये अनेकांनी घवघवीत यश प्राप्त केले.

या स्पर्धेत अनिश पाटील, अमिता घरत, अमिषा घरत, रोहित घरत, समीक्षा पाटील, नेहा पाटील, सुजित पाटील, अर्णव पाटील, शुभम ठाकूर यांनी सुवर्णपदक पटकाविले. त्यांची अहमदनगर येथे २३ व २४ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय किकबॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

याशिवाय तमन्ना गावंड, श्रुती म्हात्रे, श्लोक ठाकूर यांनी रौप्यपदक, तर अंश



म्हात्रे व अमर घरत यांनी कांस्यपदक जिंकले. या वेळी तिथे जिल्हास्तरीय पंच परीक्षा घेण्यात आली. त्यात अमिता घरत, अमिषा घरत, अनिश पाटील, मानसी ठाकूर, रोहित घरत, शुभम ठाकूर, गोपाळ म्हात्रे, संतोष मोकल, शुभम म्हात्रे, कमलाकर म्हात्रे, कंकेश गावंड, प्रीतम मोकल उत्तीर्ण झाले. या विद्यार्थ्यांना राकेश म्हात्रे, गोपाळ म्हात्रे यांनी मार्गदर्शन केले.

# रायगडचा महिला क्रिकेट संघ पुण्याला रवाना

## नियती जगतापकडे कर्णधारपदाची धुरा

**अलिबाग : प्रतिनिधी**

पुणे येथे होणाऱ्या महिला चॅलेंजर ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेसाठी रायगडचा महिला क्रिकेट संघ पुण्याला रवाना झाला. रायगडच्या महिला संघाच्या कर्णधारपदाची धुरा नियती जगताप हिच्याकडे सोपविण्यात आली आहे. अंजली गोडसेची उपकर्णधारपदी निवड करण्यात आली आहे. रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते यांनी रायगडचा महिला संघ जाहीर केला.



रायगड जिल्ह्यातील महिला क्रिकेटपटू तयार व्हाव्यात त्यांना जास्तीत जास्त सामने खेळण्यास मिळावेत यासाठी जिल्ह्यात महिला क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत, असे चंद्रकांत मते यांनी सांगितले.

**असा आहे संघ** : नियती जगताप (कर्णधार), अंजली गोडसे (उपकर्णधार), निविया आंब्रे, आदिती कदम (यष्टीरक्षक), समृद्धी कांबळे, साक्षी लाड, श्वेता सावंत, त्रिशा जामवळ, तनिशा शर्मा, समिधा तांडेल, रोशनी पारधी. प्रशिक्षक निलम पाटील, व्यवस्थापक अंजली गोडसे.





# आरपीएलच्या बाद फेरी स्पर्धेला प्रारंभ

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड प्रीमियर लीग (आरपीएल) टी-२० क्रिकेट स्पर्धा नव्हेंबर महिन्यात सुरू होणार आहे. तत्पूर्वी ज्या खेळाडूंचा लिलावात समावेश झाला नाही अशा सर्व खेळाडूंसाठी बाद पद्धतीची क्रिकेट स्पर्धा सोमवार (दि. १९) पासून सुरू झाली आहे.

एकूण ४०० खेळाडूंनी या स्पर्धेत ऑनलाइन पद्धतीने आपला सहभाग नोंदवला होता. त्यातून १२८ खेळाडूंना आठ संघांच्या मालकांनी आभासी पॉईंट्सद्वारे लिलाव करून आपापल्या संघात दाखल करून घेतले. उर्वरित सर्व अनसोल्ड खेळाडूंना स्पर्धेत खेळता यावे म्हणून बाद पद्धतीच्या स्वरूपाची एक स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. एकूण १६ संघांचा यामध्ये समावेश आहे. या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या १६ खेळाडूंना थेट आरपीएल स्पर्धेत वाइल्ड कार्ड एण्ट्री मिळणार आहे.

या स्पर्धेची सुरुवात खारघर येथील घरत क्रिकेट मैदानावर करण्यात आली. या वेळी आरपीएलचे अध्यक्ष राजेश पाटील, सचिव जयंत नाईक, खजिनदार कौस्तुभ पुनकर, प्रदीप खलाटे, सहसचिव संदीप जोशी, सुरेंद्र भाटिकरे, महेंद्र भाटिकरे, सागर कांबळे, कुणाल पाटील, भरत सोळंकी, अॅड. कौस्तुभ पुनकर उपस्थित होते. बाद फेरीची स्पर्धा संपल्यानंतर नोव्हेंबरमध्ये मुख्य आरपीएल स्पर्धेला सुरुवात होणार आहे.

# शिहू बेणसे विभागातील पाच खेळाडूंची चमकदार कामगिरी

## राष्ट्रीय वॉटर पोलो स्पर्धेकरिता निवड

**पाली : प्रतिनिधी**

शिहू बेणसे विभागातील पाच खेळाडूंची राष्ट्रीय वॉटर पोलो स्पर्धेकरिता निवड झाली आहे.

स्विमिंग फेडरेशन ऑफ इंडियाच्या वतीने ४७वी राष्ट्रीय जलतरण, वॉटर पोलो, ड्रायव्हिंग स्पर्धा १९ ते २३ ऑक्टोबर रोजी बंगळुरू येथे होणार आहे. या स्पर्धेकरिता स्विमिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या वतीने पुण्यातील डेक्कन जिमखाना जलतरण तलाव येथे खुली निवड चाचणी घेण्यात आली होती. यात रिलायन्स इंडस्ट्रीज लि. नागोठणे हेल्थ क्लबमधील जलतरणपटू भारत



चंद्रकांत कुथे, ओंकार अनंत माळी, साहिल सुरेश कुथे, सार्थक मारुती इंद्रे, प्रेषिता तरे या पाच खेळाडूंना राष्ट्रीय स्थरावर खेळण्याची संधी प्राप्त झाली आहे, तर प्रेम राज पाटील या खेळाडूची जिल्हा स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या खेळाडूंचे बेणसे सरपंच मधुकर पारधी, सामाजिक कार्यकर्ते उद्धव कुथे, माजी सरपंच प्रीती कुथे, कामगार नेते अरुण कुथे, यशवंत कुथे, चंद्रकांत कुथे, राजेश गोरे आदींनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# धोनीची पुन्हा टीम इंडियात एण्ट्री!

## मेंटॉर म्हणून सरावात सहभागी

**दुबई : वृत्तसंस्था**

टी-२० वर्ल्डकप स्पर्धेला रविवारपासून सुरुवात झाली आहे. विराट कोहलीच्या नेतृत्वात खेळणारी टीम इंडिया पाकिस्तानविरुद्धच्या सामन्याने आपल्या वर्ल्डकप मोहिमेला सुरुवात करणार आहे. विशेष गोष्ट म्हणजे भारताचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनी स्पर्धे दरम्यान संघासाठी मेंटॉरची भूमिका साकारणार आहे. दोन दिवसांपूर्वीच धोनीच्या चेन्नई सुपर किंग्जने आयपीएल २०२१चे जेतेपद पटकावले. या कामगिरीनंतर धोनीने भारतीय संघात प्रवेश केला आहे.



भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) धोनीचे टीम इंडियाच्या प्रशिक्षकांसोबतचे दोन फोटो शेअर केले. ‘किंगचे स्वागत. नव्या भूमिकेत महेंद्रसिंह धोनी टीम इंडियात परतला आहे,’ असे बीसीसीआयने या फोटोच्या कॅप्शनमध्ये म्हटले आहे.

धोनीने वर्ल्डकपसाठी कोणत्याही प्रकारचे मानधन किंवा पैसे घेतलेले नाही. भारताने २००७मध्ये पहिलावहिला टी-२० विश्वचषक जिंकला होता, तर धोनीच्या नेतृत्वाखाली संघाने २००७ टी-२० विश्वचषक, २०११ एकदिवसीय विश्वचषक आणि २०१३ चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा जिंकलेली आहे. आता संघ पुन्हा सज्ज झाला आहे.

# ‘एसी मिलान’ची विजयी घोडदौड

**मिलान : वृत्तसंस्था**

एसी मिलानने इटलीतील फुटबॉल स्पर्धा ‘सेरी ए’च्या सामन्यात व्हेरोनावर ३-२ असा निसटता विजय मिळवला. हा मिलानचा सलग तिसरा आणि आठ सामन्यांत सातवा विजय ठरला.

जिआँलुका कॅप्रारी (७वे मि.) आणि अँटोनिन बाराक (२४वे मि.) यांनी केलेल्या गोलमुळे या सामन्यात व्हेरोनाकडे २-० अशी आघाडी होती. उत्तरार्धात मात्र मिलानने उत्कृष्ट खेळ केला. ऑलिव्हिएर जिरूड (५९वे मि.), फ्रँक केसी (७६वे मि.) यांच्यासह कोरे गंटरच्या (७८वे मि.) स्वयंगोलमुळे मिलानने हा सामना जिंकला.

दुसरीकडे लॅझिओने इंटर मिलानला ३-१ अशी धूळ चारली. त्यांचे गोल कर्णधार चिरो इमोबिले (६४वे मि.), फिलिपे अँडरसन (८१वे मि.) आणि सर्गे मिलिंकोव्हिच-सॅव्हिच (९०+१वे मि.) यांनी केले.



# रोनाल्डो पुन्हा फेल!

## मँचेस्टर युनायटेडचा पराभव

**लिस्टर : वृत्तसंस्था**

लिस्टर सिटीने इंग्लिश प्रीमियर लीग फुटबॉलच्या सामन्यात मँचेस्टर युनायटेडचा ४-२ असा पराभव केला. युनायटेडचा आघाडीचा खेळाडू ख्रिस्तियानो रोनाल्डो सलग तिसऱ्या प्रीमियर लीग सामन्यात गोल करू शकला नाही.

लिस्टरकडून युरी टिलेमन्स (३१वे मिनिट), कॅगलर सोयूंचू (७८वे मि.), जेमी वार्डी (८३वे मि.) आणि पॅटसन डाका (९०+१वे मि.) यांनी गोल झळकावले. युनायटेडचे दोन गोल मेसन ग्रीनवूड (१९वे मि.) आणि मार्कस रॅशफोर्ड (८२वे मि.) यांनी केले. रोनाल्डोला मात्र या वेळीही गोल करता आला नाही.



अन्य लढतींत गुणतालिकेत अव्वल स्थानी असलेल्या चेल्सीने बेन चिलवेलच्या गोलमुळे ब्रेंटफर्डला १-० असे पराभूत केले. मँचेस्टर सिटीने बर्नलीचा २-० असा पराभव केला.

या स्पर्धेत जोरदार चुरस असून अनेक संघ जेतेपदासाठी शिकस्त करीत आहेत.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com